# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 9 | Marathi Monthly | Thane, 1 March 2024 to 31 March- 2024 | Pages 16 | Price : 10/-


# लोकशाहीचा 'DNA' सुरक्षित राखायचा असेल तर, 'NDA'ची पाडापाड ठाण्यातूनच करावी लागेल !!!

## शिवसेनेच्या जनसंवाद यात्रेच्या महाप्रचंड सभेत, राजन राजेंचे मोदी-शहांवर जोरदार शरसंधान...

**ठाणे (प्रतिनिधी) :** देशाची सध्याची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती खूप गंभीर आहे आणि म्हणून, आगामी २०२४ची निवडणूक ही, आपल्यासाठी शेवटची संधी आहे. अन्यथा, आपल्या लोकशाहीप्रधान देशाच्या प्रजासत्ताकाचा जो डीएनए आहे, तो पुसला जाण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच, लोकशाहीचा 'डीएनए' सुरक्षित राखायचा असेल तर, 'एनडीए'ची पाडापाड ठाणे शहरातूनच करावी लागेल असे जोरदार शरसंधान 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, मोदी-शहांच्या रासवट-हुकूमशाही राजवटीवर केले. शिवसेना (उद्धव बाळासाहे ठाकरे) पक्षाच्या 'मातृतीर्थ ते शिवतीर्थ' या जनसंवाद यात्रेच्या महाप्रचंड सभेत ते ठाण्याच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानात बोलत होते. यावेळी उपस्थित जनसमुदायाला आणि निष्ठावान शिवसैनिकांना संबोधित करताना राजन राजे पुढे म्हणाले की, या देशाचं, विशेषतः महाराष्ट्राचं राजकारण पार रसातळाला गेलंय, अधमतेची व नीचमतेची पातळी गाठली गेलीय. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या राजकारणात एक विचित्र सर्कस सुरु आहे. सर्वसाधारणपणे आपण पाहतो की, इंजिनाला डबे जोडले जातात; मात्र, इथे महाराष्ट्रात उलट घडायला लागलंय... डब्यांना इंजिनं जोडली जायला लागलीत. सिंगल इंजिन, डबल इंजिन, ट्रीपल इंजिन आणि आता चवथे इंजिन जोडलं गेलंय... आदर्श गृहनिर्माण घोटाळा फेम अशोक चव्हाणांच्या रुपानं. कधीकधी ही










सगळी भाऊगर्दी बघितल्यानंतर मला असं वाटायला लागतं की, बहुतेक यांचं जनता दल होणार आहे. जनता दलाचं कसं, सगळेच नेते; पण अनुयायी कुणीच नाही... तसेच, सगळी इंजिनंच, डब्बे गूल! महाराष्ट्रात हीच दुर्दैवी परिस्थिती आहे. देशात जर आपण उत्तरेकडे सरकलो आणि पाहिलं तर, आपल्याला दिसतं, तिथे नितीश कुमारांनी 'इंडिया-आघाडी'ची शानदार सुरुवात तर केली; पण, स्वतः मात्र, कधी 'एनडीए'च्या मांडीवर उडी मारुन बसले ते त्यांचं त्यांनाही कळलं नसेल...तिकडे ..(पान क्र. ४ वर)

## मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातच, ठाणेकर असुरक्षित!

### ठाणेकर नागरिकांची अग्निसुरक्षा धोक्यात, 'धर्मराज्य पक्षा'चा आयुक्तांना पत्रव्यवहार...

**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात, कर्मचाऱ्यांचा मोठ्याप्रमाणात तुटवडा निर्माण झाल्याची माहिती, माहितीच्या अधिकाराखाली उघड झाली असून, यामुळे करदात्या-कष्टकरी ठाणेकर नागरिकांची अग्निसुरक्षा धोक्यात आली आहे. यासंदर्भात, माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, ठामपाच्या अग्निशमन दलाला एकूण ८३५ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना, अग्निशमन दलाचा कारभार अवघ्या २०९ कर्मचाऱ्यांवर चालवला जात असल्याचे उघड झाले आहे. ...(पान क्र. ४ वर)


अंतरंग



'पलटूमार' (पलटू'राम', संबोधून 'रामा'ला कशाला बदनाम करायचं?)
...राजन राजे पृष्ठ क्र. ४



ठाण्याच्या वाघबीळ-कावेसर भागात, ४०० ते ५०० वृक्षांची निर्दयी कत्तल!
पृष्ठ क्र. ८



असा घडवला भाजपाच्या गुंडांनी सुसंस्कृत पुण्याच्या रस्त्यावर हैदोस
...विश्वंभर चौधरी
पृष्ठ क्र. ९

# "कंत्राटदारांच्या संघटनेची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे, त्यांना धमकावणाऱ्यांविरुद्ध तक्रार"

## कंत्राटदारांच्या संघटना असतात...पण, कंत्राटी-कामगारांच्या नसतात!

...कारण, त्यांनी संघटना-बांधणी करण्याचा (युनियन-सदस्यता स्विकारणे) साधा प्रयत्न जरी केला...तरी, या 'आधुनिक-गुलामां'ना व भांडवली-व्यवस्थेतल्या 'नव-अस्पृश्यां'ना तत्काळ कामावरुन लाथ मारुन बाहेर काढलं जातं. बरं, या 'कंपनी-दहशतवादा'विरोधात (Corporate-Terrorism) त्यांनी कुठलीही गडबड केली; तर, बाहेर देखील, त्यांना सहसा कुठे कामावर ठेऊन घेतलं जात नाही...दहशत, एवढी सर्वदूर पसरवून ठेवलेली आहे!

दीनदुबळ्यांच्या संघटना बांधल्या जाव्यात, अस्तित्वात याव्यात...असं राज्यघटनेत अनुस्यूत असताना, व्यवहारात घडत उलटंच. व्यवस्था चालवणारे बडे अधिकारी (IAS, IPS वगैरे), व्यापारी, बिल्डर्स, कंत्राटदार... या समाजातल्या समर्थांच्या, बलशाली लोकांच्या उघड किंवा छुप्या संघटना असतात. पण, संघटना नसतात, त्या साध्यासुध्या दीनदुबळ्या-शोषणग्रस्त कंत्राटी-कामगारांच्या, पोलिसदलातल्या साध्या शिपायांच्या, कंत्राटी शिक्षण-सेवक व आरोग्यसेवकांच्या, अग्निवीरांच्या वगैरे!

...खरंतरं, कंत्राटी-कामगार म्हणजे, आधुनिक 'गुलाम + नव-अस्पृश्य'; तर, गोरगरीब श्रमिकांच्या रक्तघामावर 'डाका' घालणारे व त्यातली टक्केवारी ओरपून जगणारे 'कंत्राटदार' म्हणजे वस्तुतः, या रक्तपिपासू-निर्मम-शोषक (Vampire-State System) भांडवली-व्यवस्थेतले 'चोर + दरोडेखोर'...पण, या बलशाली-सामर्थ्यसंपन्न चोर-दरोडेखोरांना, भांडवली-व्यवस्थेत आवाज उठवता येतो... पण, कंत्राटी-कामगारांसारख्या शोषित जनसामान्यांचं काय...???

...राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## International Court of Justice (ICJ) orders Israel to prevent acts of genocide with immediate effect! ...THE HINDU

ज्या इस्त्रायली ज्यूंनी ॲडॉल्फ हिटलरच्या 'वांशिक-नरसंहारा'चा सामना केला होता...त्या ज्यूंचं इस्त्रायल, हे राष्ट्रच, आज पॅलेस्टाईनींचा वंशविच्छेद करु पाहतंय, यात आतातरी कुणाला कुठलीही शंका उरली नसावी!

मणिपुरमधल्या दीर्घकालीन देशांतर्गत हिंसाचार-जाळपोळीकडे हेतूतः दुर्लक्ष करण्याचा अक्षम्य गुन्हा करणारे आणि इस्त्रायलला अगदी तत्पर व उत्साहाने पाठींबा देणारे; भाजपाई-संघीय लोक, तोंडावर आपटलेत...तभी तो, 'गोदी-मिडीया' में इतना भारी सन्नाटा है!

*...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)


THE HINDU

On Israel's obligation to prevent genocide

What provisional measures did the International Court of Justice order in the case South Africa brought against Israel on its war with Hamas in the Gaza Strip? Can the interim ruling be enforced by the ICJ? What is the verdict's impact and what happens next?

मराठी-भाषा, मराठी-माणसांसाठी, जीवाचं रान करुन लढणाऱ्या महाराष्ट्रहितैषी प्रयत्नांना योग्य दिशा दिली गेली पाहिजे. प्रज्वलन साध्य करण्यासाठी बहिर्गोल भिंगातून सूर्यकिरणं एकत्र आणली जातात, तसा या प्रयत्नांना एकत्रित गुंफण्याचा सायास करावा लागेल. दिशा एवढी अचूक, अमोघ असली पाहीजे की, 'लक्ष्यपूर्ति' कमीतकमी ताकद लावून व कायदेशीर चौकटीच्या कोंदणात बसवूनच साध्य केली गेली पाहीजे. जोपर्यंत, दुकान चालवणारे 'मराठी' नाहीत, तोवर मराठी-पाट्या लावून पोकळ मानसिक-समाधानापलिकडे आपल्या हाती काय लागणार? व्यापार-उद्योग करुन व चांगल्या पगाराच्या नोकऱ्या करुन...मराठी हातांमध्ये आर्थिक-ताकद येत नाही, एकवटत नाही; तोवर, मराठी-भाषा संवर्धनासाठी कितीही करोड दरवर्षी खर्च केले; तरी, अंति निष्पन्न काय होणार?

## प्रत्येक भारतीय तरुणाने (विशेषतः, मराठी-तरुणाईने), हे ध्यानात घ्यावं की, या रक्तपिपासू-निर्मम-शोषक व्यवस्थेचं (Vampire-State System), हेच खरंखुरं अंतरंग आहे...!!! *('THE HINDU'च्या सौजन्याने...)*

**'डेमोग्राफिक-डिव्हिडंड' वगैरे मोठे मोठे शब्द... 'मन की बात'पासून निवडणुकीच्या भाषणातील 'जन से बात'पर्यंत व्यक्त होणारी भारतीय 'तरुणाईची कवतिके' (कौतुकं), ही भांडवली-व्यवस्थेची सगळी निर्लज्ज-निर्गल सोंगढोंगं असतात!**

...जोपर्यंत, ''भांडवली-दहशतीला सपशेल शरण जाऊन, कंपन्या-कारखान्यांमधून कंत्राटी कामगार किंवा वेठबिगार म्हणून गुलामासारखी राब राब राबायला निमूटपणे तयार असते...तोवरच तिची, पत्रास ठेवली जाते. पण, जे या भांडवली-व्यवस्थेविरुद्ध संतापाने पेटून उठून 'एल्गार' पुकारु पहातात...त्या सगळ्यांचीच हालत, थोड्याफार फरकाने संसदेत 'जनजागृती'साठी घुसलेल्या वरील पाच नवतरुणांसारखीच, ही भयंकर भांडवली-व्यवस्था करत असते.

**ज्याप्रमाणे, भारतात कॉर्पोरेटीय-क्षेत्रात 'कंपनी-दहशतवादा'चा नंगानाच सुरु आहे आणि त्यातून, भांडवली-व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणाऱ्यांना खोट्यानाट्या प्रकरणात गुंतवलं जातं...तोच प्रकार, राजकारणात चालू आहे.**

आधी, कॉर्पोरेटीय-क्षेत्रच, वेगवेगळ्या प्रकारच्या बदमाषीला जन्माला घालतं आणि मग, ती बदमाषी जशीच्या तशी प्रस्थापित राजकारणीवर्ग उचलतो आणि पुढे ती बदमाषी, अधिक गर्हणीय स्वरुपात खोलवर समाजात मुरत जाते. कंपन्यांमधून कामगारांचे लढे प्रामाणिकपणे व प्राणपणाने उभारणाऱ्या कामगारांवर व त्यांच्या पुढाऱ्यांवर खोटे खटले दाखल करण्यासाठी...डरपोक, गांडूळासारख्या जगणाऱ्या इतर हिणकस बांडगुळीवृत्तीच्या कामगारांवर...नोकरीतून काढून टाकण्याचा, विविध व्यवस्थापनांकरवी दबाव आणला जातो. कामगार-कर्मचारीवर्गाकडून, 'कंपनी-दहशतवादा'चा (बाऊन्सर्सचा वापर करत केबिनमध्ये कोंडून बदली-निलंबनाची; तसेच, खोट्या पोलिस-केसेस दाखल करण्याची धमकी वगैरे देऊन) अवलंब करत, हव्यातशा कोऱ्या कागदांवर सह्या घेतल्या जातात. त्याच संतापजनक व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घृणास्पद प्रकाराचा अघोरी प्रयोग, त्या पाच तरुणांवर झाल्याने, सगळा भारत देश व्यथित व संतप्त झाला असेल, तर नवल ते काय?

**...विशेष म्हणजे, ही अशी 'भांडवली-व्यवस्था' (विद्यमान सरकार व त्याचा पाठीराखा राजकारणीवर्ग + बडे उद्योगपती-व्यापारी + शासकीय व खाजगी प्रशासकीयवर्ग/अधिकारीवर्ग) या तरुणाईला बरोबर व्यसनाधीनतेत बुडवते, एकदोन डेटापॅक मोफत देऊन मोबाईलच्या ग्लानीत ठेवते...मग, जागोजागी अडवते-रडवते आणि पाहीजे तशी 'गुलाम' म्हणून वापरुन घेते. बरं, हे सगळं, 'तरुणाईच्या नावाने चांगभलं' करण्याचा बेमालूम कांगावा करत बिनदिक्कत चालू असतं!**

उत्तर भारतात मंदिरं उभारणीचा एकमात्र कार्यक्रम यासाठीच चालू आहे, जेणेकरुन तेथील उत्तर-भारतीय तरुणाई...अशीच कायम 'गुलाम' म्हणून जैन-गुजू-मारवाडी भांडवलदारवर्गाला बिनतक्रार, कुठल्याही विद्रोहाविना कायमच उपलब्ध रहावी; पण, लक्षात कोण घेतो...???

***...राजन राजे,*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# घोडबंदर सर्व्हिस रोडच्या विलीनीकरणाची निविदा प्रक्रिया रद्द करा!

## ‘धर्मराज्य पक्षा’ची मागणी, प्रशासनाला आंदोलनाचा इशारा...

**ठाणे: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील, घोडबंदर मार्गावर असणाऱ्या, कापूरबावडी ते गायमुखपर्यंतच्या महामार्गावरील सर्व्हिस रोड मुख्य रस्त्यात विलीनीकरण करण्याचा निर्णय घेतला असून, याकामी एमएमआरडीएने नुकतीच ४०० कोटींची निविदा काढली असल्याचे वृत्त प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झाले आहे. विलीनीकरणाच्या माध्यमातून सर्व्हिस रोड आणि मुख्य रस्त्यामधील पदपथ काढले जाणार आहेत. तसेच, निविदेस मंजुरी मिळाल्यानंतर, वाहतूक पोलिसांच्या परवानगीअंति, येथील कामे हाती घेतली जाण्याची शक्यता आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, दि. १५ जानेवारी–२०२४ ते दि. १४ फेब्रुवारी–२०२४ या कालावधीत रस्ता सुरक्षा महिना उपक्रम सुरु असतानाच, सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान असुरक्षित केले गेले असल्याने, ‘धर्मराज्य पक्षा’ने संताप व्यक्त केला आहे.** याच पार्श्वभूमीवर, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर, ठाणे वाहतूक शाखेचे उपायुक्त विनयकुमार राठोड, मुख्य परिवहन आयुक्त विवेक भिमनवार आणि महाराष्ट्र राज्याच्या नगरविकास विभागाचे मुख्य सचिव यांना लिहिलेल्या पत्रात नमूद करताना, पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी म्हटले आहे की, विलीनीकरणाच्या माध्यमातून, सर्व्हिस रोड आणि मुख्य रस्त्याच्या मध्ये असलेले पदपथ काढून टाकणे म्हणजे, सर्वसामान्य करदात्या पादचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणण्यासारखे आहेच; मात्र, त्याचबरोबर नागरिकांची वित्तहानी व जीवितहानी धोक्यात आणण्यासारखे आहे. पदपथ हे, नागरिकांना चालण्यासाठी असतात. तेच काढून, एकप्रकारे नागरिकांचे जीवित धोक्यात आणण्याचा कट प्रशासनाकडून आखला जात असल्याचा थेट आरोप पत्राद्वारे करण्यात आला आहे. **मुळात, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम–१९६६ नुसार, इमारत रेषा आणि नियंत्रण रेषा यांमधील अंतरे कलम–१५४ नुसार, सर्व्हिस रोड व महामार्ग एकत्र करणे हे, कायद्याचे उल्लंघन असतानादेखील, खुद्द राज्य शासनाकडूनच सुरक्षिततेसंबंधिचे नियम पायदळी तुडवले जात असल्याबाबत, ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला आहे. यासंदर्भात, पक्षाच्या वतीने ठाणे महानगरपालिका प्रशासनाला, दि. २१/०३/२०२३ रोजी, पत्रव्यवहार (धराप/मनपाआ/ठामपा/ठाणे/२०२३/१२) करुन, सर्व्हिस रोड व महामार्ग एकत्र करण्याबाबत हरकत नोंदविण्यात आली होती. सदर पत्राची एक प्रत, महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांनाही रवाना करण्यात आली होती. दरम्यान, घोडबंदरच्या मुख्य मार्गावरील वाहतूककोंडी व सर्व्हिस रोडवरील अतिक्रमणे टाळण्यासाठी, हे विलीनीकरण करण्यात येणार असल्याचे कारण एमएमआरडीए प्रशासनाकडून देण्यात येत असले तरी, ते न पटण्यासारखे आहे.** कारण, घोडबंदर मार्गावरील होणारी वाहतूककोंडी ही, मेट्रो प्रकल्पाच्या निर्माणाधीन कामामुळे होत आहे



आणि त्याचा दोष मात्र, पदपथांवर टाकला जात आहे. शिवाय, सर्व्हिस रोडवर झालेले अतिक्रमण टाळण्यासाठी म्हणून, पदपथ काढून टाकणे हा ठाणे महानगरपालिका व एमएमआरडीए प्रशासनाचा युक्तिवादही फसवा असून, अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे ही, ठाणे महानगरपालिका प्रशासनाची जबाबदारी असताना, त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. सर्व्हिस रोडवर केली जाणारी बेकायदेशीर पार्किंग हटविणे व त्या वाहनांवर कारवाई करणे हीदेखील वाहतूक शाखेची जबाबदारी असताना, त्याहीकडे डोळेझाक केली जात आहे. त्यातच मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु असल्याकारणाने, वाहतूककोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागत आहे. **घोडबंदरची मुख्य मार्गिका अरुंद होणे, मेट्रो प्रकल्पाच्या कामांमुळे सर्व्हिस रोडची अवस्था वाईट असणे, याला सर्वसामान्य कष्टकरी–करदाते ठाणेकर नागरिक जबाबदार नसून, ठाणे महानगरपालिका प्रशासन आणि ठाणे वाहतूक शाखा हेच संयुक्तपणे जबाबदार आहेत. असे असूनही, नागरिकांच्या सुविधेसाठी व सुरक्षिततेसाठी असणारे पदपथ विलीनीकरणाच्या नावाखाली तोडले जात असतील तर, ‘धर्मराज्य पक्ष’ सनदशीरमार्गाने जनआंदोलन उभे केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा देतानाच, घोडबंदर सर्व्हिस रोडच्या विलीनीकरणास आमचा ठाम विरोध असून, नागरिकांची वित्तहानी व जीवितहानी टाळण्यासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम–१९६६ नुसार, इमारत रेषा आणि नियंत्रण रेषा यांमधील अंतरे कलम–१५४ नुसार, कायदेशीर अंमलबजावणी होण्याबरोबरच, संबंधित ४०० कोटींची निविदा तात्काळ रद्द करण्यात येऊन, ठाणेकर नागरिकांच्या आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना अमलात आणावी, अशी आग्रही मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, पत्राद्वारे शेवटी केली आहे.**



‘सुल्झर पंप्स् इंडिया एम्प्लॉईज् युनियन’च्या (सेऊ) २४व्या वर्धापनदिनानिमित्त, ‘सेऊ’ सभासदांनी संघटनेच्या ठाणे येथील हंगामी कार्यालयात उपस्थित राहून, उत्साहवर्धक वातावरणात हा वर्धापनदिन साजरा केला. विशेष म्हणजे ‘सेऊ’चे माजी (निवृत्त) सहकारी यांनीदेखील आवर्जून उपस्थित राहून, व्यवस्थापनाविरोधातील न्यायालयीन लढाईच्या पार्श्वभूमीवर, उपस्थित सर्व ‘सेऊ’ सभासदांचे मनोबल उंचावण्याचे प्रयत्न केला व आम्ही सर्व तुमच्यासोबत आहोत, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी, ‘सेऊ’ संघटनेचे अध्यक्ष मा. राजन राजे यांचे, सर्व सदस्यांनी पुष्पगुच्छ देत स्वागत केले आणि तुमच्या नेतृत्त्वावर आमचा अखंड विश्वास असून, शेवटपर्यंत आम्ही अन्यायी व हुकूमशाही व्यवस्थापनाविरोधात लढत राहू, असा ठाम निर्धार बोलून दाखवला.

## ठाणेकर असुरक्षित! ...(पान क्र. १ वरुन)

ठाणे महानगरपालिका परिक्षेत्रात, एकूण ८ फायर स्टेशन्स आणि ४ बिट फायर स्टेशन्स आहेत. त्यापैकी, अग्निशमन केंद्र अधिकाऱ्यांच्या ७ जागा तर, सहाय्यक केंद्र अधिकाऱ्यांच्या सुमारे ५० जागा रिक्त आहेत. तर, चालक/यंत्रचालकांच्या २२४ पैकी १९४ जागा रिक्त असून, फायरमन्सच्या ४५० जागांपैकी, तब्बल ३५० जागा रिक्त असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. परिणामी, अवघ्या २०९ अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांवर ठाणे शहराची सुरक्षा अवलंबून आहे. ही बाब, मुख्यमंत्र्यांच्या ठाणे शहरासाठी भूषणावह तर नाहीच, उलट ती लाजिरवाणी असल्याची टीका 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने करण्यात आली आहे. एकीकडे ठाणे शहराची वाटचाल स्मार्टसिटीकडे सुरु असताना, दुसरीकडे ठाणेकरांचे जीवनमान मात्र, धोकादायक बनले आहे. मुंबईचे धाकटे भावंडं अशी ओळख असलेल्या ठाणे शहराची लोकसंख्या, गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढलेली आहे. मोठ्याप्रमाणात निर्माण झालेल्या निवासी-संकुलांमुळे, त्याचा ताण प्रशासकीय व्यवस्थेवर पडल्याने, आज घोडबंदरसारख्या उच्चभ्रूंच्या परिसरात, पाणीटंचाईसारखी भीषण समस्या भेडसावत आहे. त्यातच ५०/५० माजली उंच इमारती उभारलेल्या असल्याने, अग्निशमन दलात कर्मचाऱ्यांचा तुडवड्यामुळे, अवघ्या ठाणेकर नागरिकांची सुरक्षा अधांतरी आहे. ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडून गगनचुंबी इमारतींना परवानगी देताना, अग्निसुरक्षेबाबत मात्र, प्रश्नचिह्न निर्माण झाले आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे, ठाणे शहराचे सुपुत्र असताना आणि त्यांचा मतदारसंघ याच ठाणे शहरात असतानाही, त्यांच्याच ठाणे शहरातील सर्वसामान्य नागरिक अग्निसुरक्षेपासून वंचित राहत असल्याचे, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना पाठविलेल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. दरम्यान, एकंदरीत या संपूर्ण पार्श्वभूमीवर, दुर्दैवाने ठाणे शहरात अग्निप्रलयाची एखादी दुर्घटना घडली आणि कर्मचाऱ्यांच्या तुटवड्यामुळे जीवितहानी झाली तर, त्याला ठाणे महापालिका प्रशासन, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर आणि महाराष्ट्राचे 'ठाणेकर' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच सर्वस्वी जबाबदार असतील, असे महेशसिंग ठाकूर व नरेंद्र पंडित यांनी, आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे.

## ...तर, 'NDA'ची पाडापाड ठाण्यातूनच करावी लागेल !!! ...(पान क्र. १ वरुन)

पश्चिम-उत्तरप्रदेशात जयंत चौधरींनी मान टाकली, त्या आसामच्या हेमंत बिस्वास यांनी तर, हजारो कोटींचा घोटाळा आपल्याला अडचणीत आणेल हे पाहिल्यावर, अगोदरच मान टाकलेली. पण, लढत राहिले ते झारखंडच्या 'झामुमो'चे हेमंत सोरेन, दिल्लीचे अरविंद केजरीवाल आणि शिवसैनिकहो, या सगळ्यांपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जो सर्वात जास्त तडफेने लढत राहिला... अवघ्या 'दिल्लीश्वर लॉबी'ला ज्याने अंगावर घेतलं, तो सह्याद्रीचा 'ढाण्या वाघ' म्हणजे, मा. उद्धवजी ठाकरे! आमच्या लहानपणापासून १९६२चं भारत-चीन युद्ध झाल्यापासून आम्ही ऐकतोय, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण कधीकाळी बोलून गेले गेले होते, हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला. पण, प्रत्येकवेळी असं घडतंच; असं नव्हे... कधीकधी जेव्हा हिमालय उन्मत्त होतो, अहंकाराने मस्तवाल बनतो; तेव्हा तेव्हा, या आतून ठिसूळ असलेल्या मदमस्त हिमालयाला आमच्या राकट देशा, कणखर देशाचा दगडाधोंड्यांचा कणखर 'सह्याद्री' आव्हान देतो, हे मा. उद्धवजींनी दाखवून दिलंय... आणि म्हणूनच, आम्हाला तुमच्या भाग्याचा हेवा वाटतो. हा असा रणधुरंदर, धीरोदात्त, लढवय्या सेनानी तुम्हाला लाभला, हे तुमचं भाग्य आहे! अशा शब्दांत राजन राजे यांनी, उपस्थितांसमोर आपल्या भावना बोलून दाखवल्या.

दरम्यान, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या 'महाप्रबोधन' यात्रेला महाराष्ट्रभरातून भरभरुन प्रतिसाद मिळाल्यानंतर, जिजाऊ माँसाहेब यांच्या बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा या जन्मगावातून त्यांनी, 'मातृतीर्थ ते शिवतीर्थ' (शिवाजी पार्क, दादर) अशी महाराष्ट्र पिंजून काढणारी जनसंवाद-पदयात्रा सुरु केली. या यात्रेच्या शेवटच्या टप्प्यात, शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार ठाण्याच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानात, दि. २९ फेब्रुवारी-२०२४ रोजी आयोजित केलेल्या सभेत, विद्यमान खासदार श्री. राजनजी विचारे, ठाणे जिल्हाप्रमुख श्री. केदारजी दिघे, जिल्हा संपर्कप्रमुख श्री. मधुकरजी देशमुख, प्रवक्ते श्री. चंद्रभानजी आझाद, ठाणे शहरप्रमुख श्री. प्रदीपजी शिंदे, माजी महापौर सौ. स्मिताताई इंदुलकर, माजी नगरसेविका श्रीमती रेखाताई खोपकर आदी मान्यवरांसह, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा अध्यक्ष श्री. राजेश गडकर, उपाध्यक्ष श्री. महेशसिंग ठाकूर, पक्षाचे खजिनदार श्री. जयेंद्र जोग, कामगार प्रतिनिधी श्री. समीर चव्हाण, 'धर्मराज्य रिक्षा-टॅक्सी संघटने'चे अध्यक्ष श्री. रमेश रेड्डी, उपाध्यक्ष श्री. सुशीलकुमार चंद्रा, श्री. रवी मिश्रा आदी पदाधिकाऱ्यांसह, कामगार सभासद आणि 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यकर्ते मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

यावेळी आपल्या भाषणात पुढे बोलताना मा. राजन राजे म्हणाले, या संघीय आणि भाजपाई लोकांची अ, आ, इ, ई ची बाराखडी आपल्यासारखी अ, अननसातला आणि आ, आईतला; अशी नसते...ती असते अ, अफवेतला आणि आ, आख्यायिकेतला! अफवा पेरायच्या आणि आख्यायिका पसरवायच्या...हेच यांचे काळे धंदे पिढ्यानपिढ्या चालू आहेत, तसेच ते चालू रहाणार...म्हणून आपण खूप सावध राहीलं पाहिजे. या लोकांनी, रामाच्या नावाने गैरवापर सुरु केलाय. खरंतर राम हा संयमी, मर्यादाशील, कुटुंबवत्सल, एकवचनी व अतिशय दयाळू-मायाळू असा 'आदर्श राजा' असतानाही, याच लोकांनी त्याला भुवया ताणलेला, अत्यंत संतापी (जणू, परशुरामच) आणि रागीट-क्रुद्ध रुपातला दाखविल्याचा एक बॅनर मी मुरबाड तालुक्यात गावोगावी पाहिला. आमचा राम, असा नव्हताच मुळी. आमचा राम एवढा प्रेमळ की, ज्या कैकयीने त्याला वनवासात पाठवलं, तिचाही राग त्याने कधी मनात धरला नाही. रावणाशी युध्द करतानाही ऋषिमुनी, लक्ष्मण, हनुमान वगैरे मंडळींना त्याच्यातला 'राग' जाणिवपूर्वक निर्माण करावा लागला; तेव्हा कुठे राम रावणाचा पाडाव करु शकला...एवढा तो हाडाचा प्रेमळ! पण, या अयोध्येत 'राममंदिर' बांधणाऱ्या संघीय आणि भाजपाई 'रावणां'नी; जसं या देशातल्या 'लोकशाही'रुपी सीतेचं अपहरण केलंय...अगदी तस्सच, आमच्या वात्सल्यमूर्ति व मूर्तिमंत रामाचं अपहरण करुन आमचा राम पळवलाय व तो आमच्यापासून दूर दूर नेलाय. रामाचं जाणूनबुजून त्यांनी विद्रुपीकरण केलं. 'जय श्रीराम' ही घोषणा किंवा रुद्रावतारी रामाची प्रतिमा... या बाबी मुळातूनच, बेगडी-बनावट व आक्रमक स्वरुपाचं 'विकृत हिंदुत्व' दर्शविणाऱ्या आहेत, ज्यातून या धर्मांध लोकांना, अल्पसंख्यांक व दलित समाजावर धार्मिक-दहशत पसरवायची आहे. जे गोरगरीब मुसलमानांच्या घरांवर बुलडोझर फिरवतात, शेतकऱ्यांवर काळे कायदे लादून त्यांच्यावर लाठीमार करतात, आमच्या महिला पहिलवानांना गुराढोरासारखं खेचत नेतात, विद्यार्थ्यांचं आंदोलन चिरडतात आणि दुसरीकडे 'राममंदिरा'च्या नावावर लोकांना गुंतवून ठेवतात. तुमच्या गलिच्छ राजकारणासाठी आमच्या हिंदू देवदेवतांना वेठीला धरु नका! मी स्पष्टच सांगतो, अयोध्येचं राममंदिर हे भांडवलदारांचं आहे. ज्या दिवशी अयोध्येच्या राममंदिराचं उदघाटन झालं, त्याचवेळी आपले उद्धवजी नाशिकच्या काळाराम मंदिरात गेले होते. आमच्या अंतःकरणातला 'खरा राम' असलाच; तर, तो तिथे आहे, ज्याच्याशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रुजवात केली. म्हणूनच, उद्धवजींनी जे पाऊल उचललं ते याच अर्थाने क्रांतिकारी आहे! अशा थेट भाषेत मा. राजन राजे यांनी आपलं मत व्यक्त केलं.

दरम्यान, आपल्या भाषणात मा. राजन राजे पुढे म्हणाले, आपल्याला या २०२४च्या निवडणुकीच्या निमित्ताने, अनेक गोष्टींचा वेगळ्या पद्धतीने विचार करायला हवा. देशात प्रचंड प्रमाणात बेरोजगारी आहेच; पण, त्याहीपेक्षा अर्धरोजगारीमुळे भीषण परिस्थिती निर्माण झालीय. आहेत त्या नोकऱ्या टिकत नाहीयेत. आठ-नऊ हजारांत पोरं, गुरासारखी राबवली जातायेत, 'बारा तासाला बारा हजार पगार', ही कुठली आर्थिक प्रगती? हल्ली 'ह.भ.प.'प्रमाणेच 'मो.भ.प.' म्हणजे, 'मोदी भक्त परायण' तयार झालेत. कालपरवा, त्या सुरेश वाडकरला काय फेफरं आलं आणि वेडाच्या भरात शिर्डीला जाऊन म्हणाला, साईबाबांनीच मोदींना दिल्लीच्या तख्तावर बसवलं म्हणे. कमाल झाली, आम्हाला संताप नाही येत? या सुरेश वाडकरांसारखे समाजात वावरणारे पांढरपेशी ग्लॅमरस मंडळीच, सर्वात जास्त बुद्धिभेद करतात. मला तर दुसराच संशय येतो की, सचिन तेंडुलकर, वीरेंद्र सेहवाग, हयात होत्या तोपर्यंत लता मंगेशकर, अमिताभ बच्चन, अक्षय कुमार, कंगना राणावत आणि ते राणा दाम्पत्य, ही सगळी मंडळी जे काही मोदींच्या भजनी लागलीयेत, त्यांच्याच पंक्तीत जाऊन बसायचा त्या वाडकरचा विचार दिसतोय. कदाचित त्याच्या डोक्यात कुठेतरी 'भारतरत्न' मिळवणं असणार. कारण, ते राजकीय उद्दिष्टांसाठी अनेकांना खिरापतीसारखं वाटलं गेलंय. प्रचंड पैसा-प्रसिद्धी कमावणाऱ्या कलाकार आणि खेळाडूंना 'भारतरत्न' देणं, योग्य आहे का? आतापर्यंत कधी सत्तर वर्षांत कधी दिलं गेलं नव्हतं, पण आता सर्रास दिलं जातंय, हे आपल्या देशाचं दुर्दैव! याच दुर्दैवाच्या दशावतारातून आपली सुटका करुन घ्यायची असेल तर, बेसावध राहू नका. आपल्याला आता वेगळा विचार करणं भाग आहे. ही निवडणूक देशातली ऐतिहासिक निवडणूक असून, आपली मुलं आणि आपल्या पुढच्या पिढ्या कुठल्या वातावरणात वाढणार आहेत? याचा निर्णय तुम्हाला-आम्हाला करायचाय. त्यासाठी मोदी-शहांची सत्ता भारतातून हद्दपार करुन, पुन्हा एकदा देशात लोकशाहीचा जागर होवो, अशी सदिच्छा यानिमित्ताने व्यक्त करतो, धन्यवाद! अशा रोखठोक व ज्वलंत शब्दांत आपल्या भाषणाचा समारोप करताना, मा. राजन राजे यांनी दिलेल्या जय महाराष्ट्र, जय हिंद (जय हिंद, जय महाराष्ट्र नव्हे) या 'धर्मराज्य पक्ष'कृत गगनभेदी घोषणेला उपस्थित जनसमुदायाने जोरदार प्रतिसाद दिला.

## ‘पलटूमार’ (पलटू’राम’, संबोधून ‘रामा’ला कशाला बदनाम करायचं?)

# नितीशकुमारांच्या ‘विश्वासदर्शक ठराव’ संमत करवून घेण्याच्या पार्श्वभूमीवर....

‘‘जेल जाने के बाद, उन्हे जंगल का जीवन याद आ रहा होगा’’, ‘गोदी-मिडीया’तल्या एका सवर्ण अँकरने असा फुत्कार टाकणं...म्हणजे द्रौपदी मुर्मू, या ‘आदिवासी’ महिलेला राष्ट्राध्यक्षा बनवल्या जाण्यातली ‘भाजपाई-नौटंकी’, भारतीय जनतेसमोर उघडी पडणं!

बँकांचे हजारो कोटी लुटून विदेशी पळून गेलेल्या व देशात राहून देश लुटणाऱ्या धनदांडग्या गुजराथ्यांच्या केसालाही धक्का न लावणारी ‘गुजराथी-लॉबी’... हाती सबळ पुरावा नसतानाही केवळ, साडेआठ एकर जमिनीच्या खरेदीचं फडतूस प्रकरण, संघीय-पद्धतीने छान रंगवत जर, हेमंत सोरेनसारख्या झारखंडच्या ‘आदिवासी’ मुख्यमंत्र्याला अटकेत टाकून भयंकर अपमानित करत असेल...आणि, दुसऱ्या बाजुला, कथितरित्या भारतातल्या सर्वात जास्त भ्रष्टाचारी मुख्यमंत्र्याला, म्हणजेच दुसऱ्या ‘हेमंत’ला (आसामचा मुख्यमंत्री हेमंता विश्वशर्मा...खरंतरं, हेमंता ‘बेशर्मा’!), सत्तेच्या मखरात बसवून त्याची पाद्यपूजा करत असेल; तर, हे दिल्लीश्वर-सत्ताधारी कुठल्या लायकीचे राज्यकर्ते आहेत... हे जरा, २०२४ च्या निवडणुकीपूर्वी जनतेनं जाणून घेणं, जनतेच्याच भवितव्याच्या दृष्टीने खूपच गरजेचं आहे.

या भाजपा-संघाचं ‘आदिवासी-प्रेम’ (बरं, ते आदिवासींना, ‘मूळ रहिवासी’ या नात्याने ‘आदिवासी’ही म्हणत नाहीत...तर,



त्यांचा ‘मूळ-निवासी’ म्हणून जंगलांवरचा पिढ्यानपिढ्या असलेला हक्क हिरावून घेण्यासाठी ‘वनवासी’ म्हणून हिणवत, दशकानुदशके त्यांचा घोर अपमान करत आलेले आहेत), त्यांच्याच ‘‘रामभक्ति किंवा हिंदुत्वा’’सारखी बनावट-बेगडी भूमिका व एक राजकीय-नौटंकी आहे, हे या निमित्ताने सूर्यप्रकाशासारखं सुस्पष्ट झालंय...वाईटात चांगलं घडतं, ते असं!

इतःपर, राष्ट्राध्यक्षा द्रौपदी मुर्मू या प्रकरणात, बोटचेपीच भूमिका बजावणार असतील; तर दलित, आदिवासी किंवा मुस्लिम व्यक्ति, सर्वोच्च स्थानी अथवा सत्तेच्या मखरात बसवण्याला ‘टोकनिझम’ (Tokenism...An act of ‘deception' that offers false pride without real power) किंवा ‘फुसकं-फसवं प्रतिनिधित्व’...यापलिकडे, काहीही अर्थ उरणार नाही. ‘‘जातीची माती करणाऱ्यांची संख्या, या देशात उदंड झालीय’’ म्हणूनच, अशा जातीयस्वरुपाच्या ढोंगी राजकीय-प्रयोगांना, जनतेनं बळी पडू नये!

सरतेशेवटी, दाहक-जळजळीत सत्य हे की, झारखंडची जमीन, जंगलं, खनिजद्रव्यांसारखी नैसर्गिक-संसाधनं गौतम अदानीसारख्या ‘गोदी-उद्योगपतीं’ना (Crony Capitalists) ‘आंदण’ देण्याचा कट शिजलेला असून हेमंत सोरेन व त्यांचं काँग्रेससोबतचं सरकार, हे त्या मार्गातील मोठा अडसर होते. झारखंड उजाड करुन टाकण्याच्या मोठ्या ‘भांडवली-षडयंत्रा’चाच तो एक भाग आहे, हे सूज्ञ वाचकांस सांगणे न लगे... पण, अशा विपरीत स्थितीत, राहुल गांधींनी ‘भारत जोडो न्याय यात्रे’च्या दरम्यानच्या तेथील सभेत, ‘‘केंद्रात सत्तेवर आल्यास, झारखंडमधील आदिवासींच्या नैसर्गिक संसाधनांच्या स्वामित्वाचं सर्वोतोपरी संरक्षण करण्याचं’’, दिलेलं ठाम आश्वासन, स्थानिक-आदिवासींच्या वेदनेवर फुंकर घालणारं, मलमपट्टी करणारं ठरलं असल्यास, नवल ते काय?

**...राजन राजे**

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)




*आदिवासी कोळी जमातीच्या अस्तित्वासाठी आणि संविधानिक हक्कांसाठी, राज्यस्तरीय महाआंदोलन समिती, महाराष्ट्र राज्य व समस्त आदिवासी कोळी जमात बांधव, ठाणे जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २९ जानेवारी-२०२४ रोजीपासून, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, शासकीय विश्रामगृहाबाहेर राज्यव्यापी महाआंदोलन सुरु करण्यात आले असून, ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजी, आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. कोळी, हिंदू कोळी वा तत्सम कोळी नोंदी असल्या तरी, अर्जदार हा कोळी-महादेव, डोंगर कोळी, मल्हार कोळी, कोळी ढोर, टोकरे कोळी यांपैकी एखाद्या जमातीचा असल्यामुळे, तो ज्या जमातीचा दावा करीत असेल, त्या अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र त्याला मिळावे, या मुख्य मागणीसह आणि इतर अनेक मागण्यांसाठी, हे राज्यव्यापी महाआंदोलन सुरु करण्यात आले आहे. यावेळी मा. राजन राजे यांनी, पनवेल तालुक्यातील आगरी-कोळी-कराडी समाजातील भूमिपुत्रांचे आपण नेतृत्व करीत असल्याचे सांगून, महाराष्ट्राचे मूलनिवासी असणाऱ्या या शूर-लढवय्या जमातीवर आपले विशेष प्रेम तर आहेच; मात्र, त्याचबरोबर या स्थानिक भूमिपुत्रांच्या न्याय्यहक्कांसाठी माझा ‘धर्मराज्य पक्ष’ सदैव तत्पर असल्याची ग्वाही दिली. आपल्या आंदोलनात व्यक्तिशः मी आणि माझा पक्ष, तनाने व मनाने आपल्या पाठीशी असल्याचे ठाम प्रतिपादन करत आंदोलनकर्त्यांना मोठा धीर दिला व त्यांचा हुरुप वाढवला. यावेळी ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे प्रतिनिधी श्री. समीर चव्हाण हेदेखील उपस्थित होते.*

# लाखो वर्षांपूर्वी माणसाची शेपटी गळून पडली आणि अलिकडेच, त्याची 'जीभ'ही गळून पडलीय!

कहाणी सांगायचं निमित्त, घडवत असलेला एक अपूर्व योग, ज्यातून आम्ही काही बोध कधि घेतच नाही!!

**कम्युनिस्टांच्या, गिरणगावापासून संपूर्ण महाराष्ट्रात निनादत असलेल्या, 'वर्गलढ्या'च्या लालरंगाच्या तुतारीने १९६०-७० पर्यंत राजकीयदृष्ट्या चांगल्यापैकी जागृत असलेल्या 'कामगारा'मुळे, 'कामगार' या शब्दाला चांगली प्रतिष्ठा होती. त्यानंतर, महाराष्ट्रात उदयाला येऊ लागलेल्या राजकीय घराण्यांनी 'कामगार' या शब्दाविषयीच, भांडवलदारांची दलाली करुन (त्यातूनच, क्रांतिमैदान असलेली 'लालबाग', कधि 'दलालबाग' बनली कुणाला कळलंसुद्धा नाही) समाजात घृणा पसरवण्याचं षडयंत्र जोरात सुरु केलं आणि ते बव्हंशी यशस्वी झालं. कामगार म्हणजे, आळशी-उद्धट-दादागिऱ्या करणारा बेजबाबदार-कामचोर समाजघटक, कमिटी-मेंबर म्हणजे युनियन-ऑफिसमध्ये फुटकळ गप्पा मारत जगणारी आयतोबी फुकटखाऊ जमात, कामगार म्हणजे, पगार-बोनसभत्त्यापलिकडे काडीमात्र वैचारिक कुवत नसलेले व त्यामुळेच चांगले राजकीय-कार्यकर्ते बनण्याबाबत बिनकामाचे, वगैरे वगैरे शेलकी विशेषणे उठताबसता लावत, या संपूर्ण कामगार-कर्मचारीवर्गाला अत्यंत पद्धतशीररित्या, महाराष्ट्रातल्या सत्तर-ऐंशीच्या दशकातल्या नव्या राजकीय-नेतृत्त्वाने, समस्त भांडवलदारांची 'सुपारी' वाजवत साफ बदनाम केलं... एकदा का बदनामीचा ऊरुस आटोपला की, मग कुणालाही 'संपवणं' फार सोप्पं काम होतं... झालंही अगदी तसंच, लालबागच्या 'कृष्णा देसाई' हत्येपश्चात, महाराष्ट्रातली अवघी कामगार-चळवळ मोडीत निघायला प्रथमच प्रारंभ झाला.**

पुढे, या भाडवलदारांच्या 'दलाल' असलेल्या राजकीय नेत्यांच्या पक्षांनी भरपूर युनियन्स चालवल्या; पण, तो बक्कळ पैसा मिळवून देणारा 'धंदा' म्हणून चालवल्या! त्या युनियन्सनी जागोजागी भांडवलदारांशी उघड हातमिळवणी करत 'मांडलिकत्व' स्विकारलं आणि पाहता पाहता कामगार-चळवळ, फक्त एक केविलवाणी 'वळवळ' बनायला लागली.

या विपरीत परिस्थितीत डॉ. दत्ता सामंतांच्या रुपाने, आपली ओळख आणि अस्मिता गमावलेल्या कामगार-चळवळीला, पुनश्च एक आश्वासक, आक्रमक व आरपार प्रामाणिक रुपडं लाभलं खरं... पण, त्या 'डॉ. दत्ता सामंती' चळवळीला, कुठलंही वैचारिक अथवा नैतिक अधिष्ठान दुर्दैवाने अजिबात नव्हतं!

सर्वसाधारणपणे, एका मालकाची एकच कंपनी असणं, या तत्कालिन पूरक औद्योगिक परिस्थितीमुळे आणि काँग्रेसफुटीच्या पार्श्वभुमीवर स्व. इंदिरा गांधींना महाराष्ट्रात हवा असलेला 'डावा चेहरा' म्हणून डॉ. दत्ता सामंतांना लाभलेल्या भक्कम 'राजाश्रया'मुळे अल्पावधीतच डॉ. सामंतांच्या स्वतंत्र कामगार-चळवळीची घोडदौड चारही दिशांना सुरु झाली... पण, गिरणीसंपाच्या निमित्ताने तो 'राजाश्रय' संपला आणि खाउजा' (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणरेट्यात डॉ. सामंतांच्या स्वतंत्र कामगार-चळवळीला घरघर लागायला सुरुवात झाली... अशातच, डॉ. दत्ता सामंतांच्या हत्येनं कामगारांच्या संपांचं पर्व संपलं आणि चळवळही जवळपास संपली.

या मन सुन्न करणाऱ्या भीषण पार्श्वभुमीवर, माझ्यासारख्या छोट्या पुढाऱ्याच्या ज्या गोष्टी प्रकर्षाने ध्यानात आल्या, त्या लाखो कामगारांचं नेतृत्त्व करणाऱ्या भल्या भल्या पुढाऱ्यांच्या ध्यानात आजवर का आल्या नाहीत किंवा ती त्यांची राजकीय-कुवत नव्हती की, नव्हती त्यांची 'राजकीय-इच्छाशक्ती'?

.... यासंदर्भात, नव्वदीच्या दशकाच्या सुरुवातीलाच मला प्राधान्याने जाणवलेल्या काही गोष्टी पुढीलप्रमाणे....

१) कामगार-चळवळीला मजबूत नैतिक व वैचारिक अधिष्ठान, हे अत्यावश्यक आहे आणि त्याविना, कामगार-चळवळ काही वर्ष सोडाच; तर, काही महिनेही टिकणं, अशक्य आहे आणि सर्वत्र तसं चित्र मौजूद होतंच.... आणि, म्हणूनच, श्रीकृष्णाचा जीवनसंदेश, शिवछत्रपतींची राजनीति, राष्ट्रपिता म. गांधींची 'अहिंसे'ची संकल्पना व 'दरिद्री-नारायणा'च्या पुनरुत्थानाची राष्ट्रीयप्रेरणा आणि बाबासाहेबांचा 'समतेचा संदेश' (ज्याला, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सध्याच्या परिभाषेत 'समृद्धी सर्वांची' अथवा 'Shared-Prosperity' म्हटलं जातं), ही माझ्या कामगार-कर्मचारीवर्गाच्या चळवळीची चतुःसूत्री मी बनवली आणि काटेकोरपणे व अतिशय कटाक्षाने ती डोळ्यात तेल घालून अत्यंत कष्टपूर्वक, सतत जीव धोक्यात घालून अंमलात आणली. म्हणून, अनेक कंपन्यांमधून हजारोंच्या संख्येने कामगार-कर्मचारीवर्ग समृद्धीला पावला आणि कंत्राटीकरणाच्या भयंकर रेट्यातही 'कायम' कामगार म्हणून सुखसमाधानी जीवन जगला... पण, पुढे काय?

२) 'कंत्राटी-कामगार पद्धती', हा संपूर्ण कामगार-चळवळीला लागलेला मूळ रोग, ही 'महाअवदसा' असून ती महाराष्ट्रातल्याच नव्हे; तर संपूर्ण भारतातल्या कामगार-कर्मचारीवर्गाच्या अन्नात माती कालवेल.... हे बेंबीच्या देठापासून ठोठो बोंबाबोंब करत गर्जून मी सांगत होतो... पण, ऐकणारे कान नव्हते की, विचार करणारे मेंदू नव्हते उरले! आरक्षणासाठी महाराष्ट्रभर निघालेल्या असंख्य 'मराठा महामोर्चां'च्या विषयपत्रिकेवर, हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा नसावा, हे केवढं दुर्दैव!!

कंत्राटी-कामगार पद्धतीविरुध्द 'धर्मयुद्ध' पुकारत, त्याच प्रश्नावर मी लोकसभा-विधानसभा निवडणूक २००९ साली लढवली; पण, ८०% कामगार-कर्मचारीवर्ग असणाऱ्या मतदारसंघाने त्यांच्यासाठी तहहयात लढणाऱ्या नेतृत्त्वाला राजकीय-जागृतीअभावी नाकारले.

कामगार, 'कामगार' म्हणून मतदान करायला तयार होत नाही, तोवर हे चित्र बदलणं केवळ अशक्य! जगातलं राजकारण कामगार आणि कामगार नेते चालवतात... पण, आपल्या इथे जातधर्मावर, सर्जिकल-स्ट्राईकवर, राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांवर, मंदिर-मस्जिदीवर आणि फाजील अस्मितेवर राजकारण चालतं... एकवेळ, संसद-विधिमंडळात रोजगारनिर्मितीवर चर्चा होते; पण, तो रोजगार, ती नोकरी कुठल्या लायकीची असावी, यावर सगळेच प्रस्थापित राजकीय पक्ष मूग गिळून असतात! अशातऱ्हेनं, 'राजकीय वटवृक्षा'चा आधार नसलेल्या कामगार-चळवळ नावाच्या वेलीला... उत्तरोत्तर, पायदळी तुडवणं, भांडवली-व्यवस्थेला अगदीच सोप्पं काम झालं!

३) युरोप-अमेरिकेत जसे निम्नतम वेतनमान आणि सर्वोच्च वेतनमान यात १ : १२ ते १ : २० इतक्या गुणोत्तराचा आग्रह धरला जातो (जे गुणोत्तर,आपल्याकडे १ : १००० च्याही पलिकडे आहे)... त्यासाठी, राष्ट्रीयस्तरावर मोठ्या चळवळी होतात, जनतेमधून 'सार्वमत' (Referendum) घेतलं जातं. इथे भारतात मात्र, त्याचा साधा उल्लेख नाही, चर्चा नाही... मग, तशी धोरणं कुठून राबवली जाणार? म्हणून, आपल्याकडे 'किमान-वेतन', हे धड बेकार-भत्त्याच्याही लायकीचं नसतं आणि असं, तुटपुंज 'किमानवेतन', एकही पैसा खर्च न करता १०० वर्षांचं एकत्र केलं; तरच, कुठे ठाणे, पुणे, मुंबईसारख्या शहरांमधून १BHK फ्लॅट घेणं शक्य होईल, अशी ही १० x १० च्या कोंदट कोंडवाड्यात रहाणाऱ्या शहरी श्रमिकांची मोठी शोकांतिका होय!

अमेरिकेत (युरोपसह सर्वच प्रगत राष्ट्रांमध्येसुद्धा) 'किमान-वेतन' प्रति तास ७.२५ ते १५ डॉलर्स या हिशोबाने, आठवड्याचे तेथील कामाचे एकूण तास ४० धरले तर, महिन्याचं 'किमान-वेतन' रु.९०,०००/- ते १,८०,०००/- (सरासरी रु. दिड लाख) असतं आणि जर, आपल्याकडच्या प्रमाणे आठवड्याचे कामाचे तास ४८ धरले तर, रु.१,००,०००/- ते रु.२,१५,०००/- (सरासरी रु. पावणे दोन लाख) इतकं ते मोठं होईल.

विशेष बाब म्हणजे, अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष जो बायडेन यांनी त्यांच्या कार्यकाळाला १०० दिवस पूर्ण होत असताना, संपूर्ण अमेरिकेतील सगळ्याच राज्यांमध्ये 'किमान-वेतन' प्रति तास १५ करण्याची हाक दिलेली आहे आणि कामगार-संघटनांच्या (Unions) अधिकच्या बळकटीकरणासाठी कामगार-कायद्यात अनुकूल बदल करण्याचे स्पष्ट संकेत दिलेत. भारतातल्या कुठल्या पंतप्रधान, कुठल्या मुख्यमंत्र्याने, असं काही अखिल कामगार-कर्मचारीवर्गासाठी भरीव, भरघोस योगदान दिलंय कधि किंवा देतील कधि?

४) इथे वेतनमान वाढणं दूर राहीलं; पण, तंत्रज्ञान प्रगत झाल्यामुळे कामगार-कर्मचारीवर्गाचे जगभरात कामाचे तास कमी होतं असताना, आपल्याकडे गंगा उलटी वाहतेय. सध्या, आपल्या अर्थव्यवस्थेची केवळ 'जॉबलेस-ग्रोथ'(Jobless Growth) अशी वाटचाल नसून, तंत्रज्ञानाचा बेसुमार व गैरवापर करत 'जॉबलॉस-ग्रोथ'(Jobloss Growth) हा भयंकर 'कॉर्पोरेट-फंडा' चालू झालाय... एकीकडे कंपन्यांच्या वार्षिक उलाढाली वाढत चालल्यात; तर, दुसरीकडे नोकऱ्यांची संख्या मात्र, अद्ययावत तंत्रज्ञानामुळे घटत चाललीय, अशी जीवघेणी विसंगती आपल्या अर्थव्यवस्थेत निर्माण झालीय. त्यामुळे, (६ x ४ = २४ अशा) सर्वांसाठी सहा तासांच्या शिफ्ट्स् होणं (ज्यातून, ३३% बेकारीदेखील आटोक्यात येईल आणि सार्वजनिक वहातूक व्यवस्थेवरचा ताणही कमी होईल), ही काळाची गरज असण्याच्या पार्श्वभुमीवरचं, हे मन सुन्न

करणारं चित्र आहे.

५) युरोप-अमेरिकेत (उदा. फ्रान्स, स्पेन, जर्मनी, स्वित्झर्लंडमध्ये) 'किमान-वेतन' नुसतचं गलेलठ्ठ नाही; तर, ते परदेशातील कामगारांनाही देणं बंधनकारक आहे; अन्यथा, तेवढं न देणाऱ्या व्यवस्थापकास तत्काळ तुरुंगवास भोगायला लागतो... अनुचित कामगार प्रथा अथवा Unfair Labour Practiceचा अवलंब (उदा. व्यवस्थापनाने युनियनबाजीत बेकायदेशीर हस्तक्षेप करणे, बेकायदा कंत्राटी-कामगार पद्धत राबविणे, कामगार-कर्मचारीवर्गाची जाणिवपूर्वक छळवणूक करणे व त्यांच्यात बेकायदेशीर पक्षपात करणे, करार मोडणे वगैरे वगैरे) केला तर, व्यवस्थापकीय मंडळींची थेट तुरुंगात रवानगी होते. आपल्या इथली यासंदर्भातील पद्धत मात्र, आमच्या कायदे करणाऱ्या खासदार-आमदारांनी जाणिवपूर्वक वेळखाऊ व कचखाऊ ठेवल्यामुळे, 'अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केल्या'बद्दल कुणा व्यवस्थापकाला इथे घडलाय कधि तुरुंगवास?

त्यामुळेच, आज भांडवलदार, ब्रह्मा, विष्णू, महेश बनलेत... ठेविले अनंते, तैसेचि रहावे, या उक्तिनुसार आता, ठेविले कंपनी व्यवस्थापने, तैसेचि रहावे, ही नवी औद्योगिक व सेवाक्षेत्रातली 'गुलामगिरी' सगळीकडे आलीय! 'मार्केट-प्राईस'(Market price)च्या फसव्या बुळबळीत आवरणाखाली कामगार-कर्मचारीवर्गाचा लिलाव (Labour rbitrage) सगळीकडेच उघडपणे बेलाशक पुकारला जातोय आणि कुठून विरोधाचा सोडाच, पण, साधा निषेधाचा शब्दही उमटायला तयार नाही! अनपढ साधा श्रमिक असो वा असो उच्चशिक्षित अभियांत्रिकी अथवा माहिती-तंत्रज्ञान (I.T.) क्षेत्रातला तंत्रज्ञ... सगळेच सध्या एका जहाजावरचे प्रवासी बनलेत!

HR/IR व्यवस्थापकिय मंडळींचा एक 'अदृश्य हात'(आठवा, डम स्मिथचा बाजारपेठेतला भांडवली 'अदृश्य हात'), बाजारु-किंमतीच्या (मार्केट प्राईस) गोंडस नावाखाली सगळ्या कामगार-कर्मचारीवर्गाचा खिसा, कसलेल्या 'खिसेकापू'सारखा कायम कातरत असतो; पण, दिशाहिन कामगार-कर्मचारीवर्गाला ते धड उमगत नाही आणि त्यामुळे, ते संघटनेशी एकतर फटकून तरी रहातात किंवा संघटनेशी बेईमानी करुन संघटनाच संपवतात व स्वतःचं व इतरांचं भविष्य बरबाद करतात.

'कंत्राटी-पद्धती'च्या सापळ्यात अडकल्यामुळे, शेक्सपियरच्या 'हॅम्लेट' या नायकाच्या टू बी ऑर नॉट टू बी(To be or not to be) या स्वगताच्या परिभाषेत बोलायचं तर, लग्न करावे की, न करावे (To marry or not to marry) या विवंचनेत अवघ्या महाराष्ट्राचा शिक्षित-अर्धशिक्षित नवतरुणवर्ग सध्या आहे... उंदराप्रमाणे 'कंत्राटी' सापळ्यात अडकलेला तरुण कंत्राटी कामगार-कर्मचारीवर्ग, ही महाराष्ट्राची नवी दुर्दैवी ओळख बनलीय!

काश्मीरमधला आतंकवाद एकवेळ परवडला; पण, उद्योग-सेवा क्षेत्रात 'स्मशान-शांतता' पसरवणारी सध्या सर्वत्र प्रचलित असलेला 'कंपनी-दहशतवाद'(Corporate-Terrorism) हा जास्त खतरनाक (भाडोत्री बाऊन्सर्सचा सढळ वापर तसेच, कामगार खातं व इतर संबंधित सरकारी यंत्रणा यांच्याशी साटेलोटं करुन कायदेकानून धाब्यावर बसवून निर्माण केली जाणारी)! करोडो आत्म्यांचा आक्रोश बनलेली ही, राष्ट्रीय दृष्टीकोनातून सर्वात मोठी व भयंकर समस्या असतानाही, राजकीय-प्रशासकीय व्यवस्था तर सोडाच; पण, देशात अस्तित्वात असलेल्या लाखो NGOs देखील त्याविषयी अवाक्षरसुद्धा काढत नाहीत... कारण, पुन्हा तेच, क्षुद्र स्वार्थापोटी या सगळ्यांचीच जीभ गळून पडलीय! लहानसहान व खरंतरं, राजकीय-प्रशासकीय व्यवस्थेचे विषय असलेल्या, नसत्या भानगडीत गुंतून समाजसेवेचा आपला तथाकथित कंड शमवत, देशातल्या सगळ्यात मोठ्या समस्येकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि अन्यायी-अत्याचारी व्यवस्थेविरुद्ध तोंडातून 'ब्र'सुद्धा न काढणाऱ्या या लाखो NGOs करायच्यात काय? फक्त, बक्कळ देणग्यांमधून आपली आर्थिक सोय लावत व स्वतःचं फसवं समाधान करत, या 'संस्थान' बनलेल्या खाजगी स्वयंसेवी-संस्था (NGOs), शोषक-अन्यायी राजकीय-प्रशासकीय व्यवस्था बळकट करण्याचंच काम करतात! या सरंजामी व्यवस्थेतले बडे बडे सरकारी अधिकारी आपल्या जबाबदाऱ्या न्यायालयांवर ढकलून मोकळे होताहेत, हेच चित्र सगळीकडे दिसतंय... न्यायालयं काय काय म्हणून कामं करतील?

'कामगार' नावाचा उल्लेख असला; तरी, कामगार खातं, नक्की काय काम करत आणि कुणासाठी राबतं, हा मोठा संशोधनाचाच विषय आहे. संप करायची कामगारांनी चुकूनम ाकून कधि नोटीस दिलीच तर, झोपेतून जागं झाल्यागत तत्परतेनं त्यात अडथळे उभं करणारं हे कामगार-खातं, एरव्ही कामगारांच्या पोटतिडकीच्या प्रश्नांवर अगदी षंढ आणि थंड असतं! कामगार-सचिवांना, कामगार-मंत्र्यांना, कामगार आयुक्त-उपायुक्तांना भेटा; नाहीतर, शेकडो निवेदनं द्या... तरीही, बेकायदेशीररित्या सर्वत्र सर्रासपणे चालू असलेल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'बाबत ते ढिम्म् हलणार नाहीत. राजकारणी, कामगारांच्या हितासाठी कायदे करायला तयार नाहीत, उलटपक्षी जे थोडेबहूत शिल्लक आहेत, तेही ते रद्द करु पहातायत.... कामगार कायदे म्हणजे, मालक कायदे, काम गार खातं म्हणजे, मालक खातं, ही भीषण परिस्थिती आहे.

'कंपनी-दहशतवादा'मुळे (Corporate-Terrorism), हाताळणीच्या दृष्टीने कामगार-चळवळीच्या ताकदीबाहेरचे, हे विषय झालेत. कामगार-कर्मचारीवर्गामध्ये थोडी जरी राजकीय-जनजागृती निर्माण झाली; तरी, हे षडयंत्र तत्काळ मोडून काढता येईल... 'धर्मराज्य पक्षा'चे आमदार-खासदार संसदेत, विधिमंडळात निवडून गेले तर, कामगारांच्या केसाला धक्का लावायची आहे कुणाची बिशाद?

एवढा सगळा प्रकोप आणि करोडो आत्म्यांचा आक्रोश असतानाही सगळीकडे 'स्मशानशांतता' कशी? तर, त्याचं उत्तर हेच की, पूर्वी आपल्याकडे जेव्हा, 'सतीप्रथा' होती; तेव्हा, पतीच्या जळत्या चितेवर बळी चढवली जाणाऱ्या स्त्रीचा भयंकर आक्रोश कुणाच्या कानी पडू नये म्हणून मोठम ोठे ढोल बडवले जायचे... आता, कामगार-कर्मचारीवर्गाचा कामाच्या ठिकाणचा आक्रोश कानी पडू नये आणि त्यांचा त्यांनाही ऐकू येऊ नये म्हणून, टीव्हीवर गाण्याबजावण्याच्या विविध स्पर्धा, दहीहंड्या-गरबे-सार्वजनिक गणेशोत्सव/पूजा वगैरेंचा वर्षभराचा रतीब, कुठले न् कुठले सतत सुरु असलेले क्रिकेटचे सामने, मंदिर-मस्जिदीसंबंधी (उदा. राममंदिर बांधणी वगैरे) भावनिक कल्लोळ, राजकारण्यांच्या एकमेकाविरुद्धच्या आरोप-प्रत्यारोपांचा गदारोळ... याची व्यवस्थेकरवी छान तजवीज केली जाते आणि या अशा गलबलाटात, हा करोडो आत्म्यांचा आक्रोश कुठून कानी पडावा?

निर्भीड, कणखर साहित्यिका दुर्गा भागवत म्हणायच्या, कामाठीपुऱ्यातल्या एका 'गिल्डर लेन' नावाच्या अरुंद गल्लीने, एका बाजुला आमच्यासारख्या घरंदाज स्त्रिया आणि विरुद्ध बाजुला पोट जाळण्यासाठी देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया... असा मोठा दुर्दैवी भेद निर्माण केला. अगदी तस्साचं भेद, कंत्राटी आणि कायम, या व्यवस्थापकिय 'शकुनी-भेदनीति'च्या दोन शब्दांनी कामगारांनी स्वतःमध्ये हकनाक करुन घेतलाय... त्यातूनच सध्या, औद्योगिक जगतात, कामगारचं कामगाराचा खरा शत्रू बनलाय... मालक, व्यवस्थापनं, हे त्याचे नंतरचे शत्रू होतं!

'कंत्राटी-कामगार' जणू जिवंत हाडामांसाची माणसंच नव्हेत, अशा आविर्भावात कंपन्यांमधून उरलेसुरले 'कायम' कामगार-कर्मचारी, त्यांच्या प्रति, अत्यंत संवेदनशून्यतेनं वागताना दिसतात व फक्त, आपल्या नोकऱ्या टिकतील कशा आणि पगार-बोनस वाढतील कसे, एवढ्याचं आत्यंतिक स्वार्थी, संकुचित व नीच दृष्टीकोन बाळगतात... जे नेमकं, फोडा आणि झोडा या कुटील नीतिने, या सगळ्या बदमाष व्यवस्थापकिय मंडळींच्या, चांगलंच पथ्यावर पडतं! त्यात, बहुसंख्य कंपन्यांमधून 'कमिटी-मेंबर' (यात, अनेक चांगले अपवादही असतात, पण, सुक्याबरोबर हे ओलं जळून जाताना पहावं लागतं) नावाची स्वार्थी, अज्ञानी 'बांडगुळं' (जी बहुशः, कामगारांनी नव्हे तर, कंपनी-दहशतवादाच्या बळावर, लोकशाहीतत्त्वाचा साफ गळा घोटून HR/IR व्यवस्थापकिय मंडळींनीच निवडलेली असतात) स्वतःचा स्वार्थ, फुकटचा मिळणारा मोठेपणा जपण्यासाठी सगळीकडे सर्रास कामगारांचा घात करतात (अशांना, आपल्या व्यवस्थापकीय-स्वार्थासाठी हवा भरुन तट्ट फुगवण्यात व्यवस्थापकीय मंडळी एकदम वाकबगार असतात आणि गरज संपली की, त्यांना बऱ्याचदा टिश्श्यूपेपरसारखं लागलीच वापरुन फेकूनही देतात).

१७५७ची प्लासीची पहिली लढाई मोजक्या सैनिकांनिशी इंग्रज जिंकू शकले, ते केवळ 'मीर जाफर'च्या गद्दारीनेच! खुर्ची आणि पैसा, या रॉबर्ट क्लाईव्हने अचूक टाकलेल्या जाळ्यात अडकून 'मीर जाफर'ने देश विकला आणि देशाला १५०-२०० वर्षांच्या गुलामगिरीत ढकलण्याच्या 'महापातका'चा तो धनी बनला... आज असे अनेक मीर जाफर उद्योग-सेवा क्षेत्रातील आस्थापनांमध्ये जागोजागी पैदा झालेत आणि प्रत्येक कंपनी-व्यवस्थापन, कामगार-संघटना मोडून काढण्यासाठी असे अवसानघातकी 'मीर जाफर' सहजी हुडकून काढतातच.... मग, लोखंडाचे हिणकस कण (सोन्याचे कण नव्हे) चुंबकाभोवती गोळा व्हावेत; तसेच, एका 'नीचात्म्या'भोवती, अनेक 'नीचात्मे' संधि साधत आपसूक गोळा होऊ लागतात आणि संघटना घडवण्यापेक्षा, संघटना फोडणं, हे लाखपटीने सोप काम असल्याने, प्रत्येक ठिकाणच्या कामगार संघटनेला स्वाभाविकच घरघर लागत जाते. या अशा नीच-नराधमांमुळेच, आता महाराष्ट्रात कुठेही खऱ्या अर्थाने कामगार-संघटना चालवणं, ही जवळपास अशक्य कोटीतली बाब बनलीय... कामगार-चळवळीचं 'श्राद्ध' घालण्याच्या महापातकाचे जे अनेकजण 'धनी' आहेत; त्यात, हीच 'मीर जाफरी' वृत्तीची गद्दार मंडळी सर्वत्र आघाडीवर आहेत!

तेव्हा, कुणी बोध घेवो अथवा न घेवो, कुणाचा 'जीभ' नावाचा अवयव शिल्लक असो वा नसो... १ मे, आंतरराष्ट्रीय कामगार आणि शिवछत्रपतींच्या महाराष्ट्राचा स्थापनादिन, हा देवदुर्लभ योग साधत, कोविड-१९ महासंसर्गजन्य साथीच्या अवघड स्थितीतही, जनजागृतीचं यज्ञकुंड चेतवत ठेवणं, हे आमचं 'धर्मकर्तव्य' आहे आणि ते आम्ही कुठल्याही परिस्थितीत पार पाडणारच!

***....राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)

# ठाण्याच्या वाघबीळ-कावेसर भागात, ४०० ते ५०० वृक्षांची निर्दयी कत्तल!

## संबंधित विकासकाविरोधात, गुन्हा नोंदविण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील घोडबंदर रस्त्यावर असलेल्या, वाघबीळमधील कावेसर भागात, सुमारे ४०० ते ५०० वृक्षांची कत्तल झाली असून, ही वृक्षतोड एका बांधकाम व्यवसायिकाने केल्याची चर्चा आहे. कत्तल झालेल्या वृक्षांमध्ये हेरिटेज झाडांचा समावेश असल्याचे खात्रीलायक वृत्त, प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झालेले आहे. एकीकडे ठाणे शहरातील हरितक्षेत्र वाढविण्यावर भर दिला जात असतानाच, दुसरीकडे मात्र, वाघबीळ-कावेसर येथील नेरोलॅक कंपनीच्या जागेवरील ४०० ते ५०० वृक्ष निर्दयीपणे कापण्यात आल्याचे उघड झाले आहे. सदर घटना उघड होताच, ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रताप सरनाईक, स्थानिक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि वृक्ष प्राधिकरणाचे उपायुक्त, यांनी घटनास्थळी जाऊन, याप्रकरणी कारवाईची मागणी केली असल्याचेही प्रसिद्धीमाध्यमांतून समजते.** दरम्यान, या ठिकाणी वड-पिंपळ तसेच, अनेक दुर्मिळ प्रजातींची झाडे होती. या झाडांवर पक्षांचा नैसर्गिक अधिवास होता, तोच उध्वस्त करुन संबंधित धनदांडग्या व भांडवलदारी प्रवृत्तीच्या विकासकाने, निसर्ग आणि पर्यावरणाच्या संवर्धनालाच नख लावले आहे. या अमानवी-अनैसर्गिक कृत्याबाबत 'त्या' क्रूरकर्मा बांधकाम व्यवसायिकाचे नाव जाहीर करून, त्याच्यावर त्वरित गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आग्रही मागणी भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी पक्ष असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त, महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचे उपायुक्त आणि कासारवडवली पोलीस स्टेशन यांच्याकडे एका लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, या संतापजनक घटनेच्या पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, संयुक्तपणे लिहिलेल्या पत्रात, प्रशासनाच्या निदर्शनास आणून देताना म्हटले आहे की, मुंबई शहराच्या वांद्रे या उपनगरात असणाऱ्या, नेक्टर को.ऑप.हौ. सोसायटीच्या आवारातील झाड, सोसायटीच्या अमित धुतीया नामक व्यक्तीने, बृहन्मुंबई महानगरपालिकेची




कोणतीही परवानगी न घेता झाड तोडल्याने, २०१४ साली त्याच्याविरोधात गुन्हा नोंद झाला होता. सदर व्यक्तीने आपल्यावरील गुन्हा रद्द करण्यात यावा अशी मागणी, मुंबई उच्च न्यायालयाकडे केली असता, याप्रकरणी गुन्हा रद्द करण्यास न्यायालयाने नकार तर दिलाच; उलटपक्षी, झाडाच्या सर्व फांद्या तोडल्या गेल्याने, काही पक्षांची घरटी उध्वस्त झाली, काहींची अंडी फुटली, काही पक्षी मरण पावले, काही पक्षी जाळ्यात अडकले आणि काही पक्षी जाळ्यात अडकून त्यांना दुखापत झाली. परिणामी, सकृतदर्शनी गुन्हा घडल्याचे स्पष्ट होत असल्याने, दिलासा दिला जाऊ शकत नसल्याचे आदेश मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिले असल्याबाबत, प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, ठाणे शहरात वर्षभरात सहा मियावाकी वनांच्या माध्यमातून तब्बल १ लाख ३२ हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले आहे. शिवाय दोन ठिकाणी अशाच प्रकारच्या जंगल उभारणीचे काम सुरु असून, त्याव्यतिरिक्त आणखी तीन ठिकाणी, असे जंगल करण्याचे ठाणे महानगरपालिकेचे नियोजन आहे. एकीकडे ठाणे शहरातील हरित-क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीकोनातून 'मियावाकी'सारखे पर्यावरणवादी उपक्रम राबवायचे आणि दुसरीकडे मात्र, धनदांडग्या बांधकाम व्यावसायिकाने महापालिका प्रशासनाच्या नाकावर टिच्चून, बिनदिक्कतपणे एक-दोन नव्हे; तर, तब्बल ४०० ते ५०० वृक्षांची निर्दयी कत्तल करायची, यापेक्षा दुसरी लाजिरवाणी बाब ती कोणती? असा संतप्त सवाल महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, पत्रातून उपस्थित केला आहे. एक पर्यावरणवादी पक्ष म्हणून, **'धर्मराज्य पक्षा'च्या भावना अत्यंत तीव्र असून, वृक्षतोडीच्या या घटनेचा कठोर शब्दांत निषेध व्यक्त करीत असतानाच, याप्रकरणी संबंधित बांधकाम व्यावसायिकाचे नाव जाहीर करुन, त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाईअंतर्गत, गुन्हा नोंदविण्यात यावा; तसेच, या जागेवर उभे राहिलेले बेकायदेशीर बांधकाम तात्काळ निष्कासित करण्यात यावे. याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येऊन, संबंधित विकासकाला पाठीशी घालायचा प्रयत्न ठाणे महापालिका प्रशासन किंवा पोलीस प्रशासनाकडून झाल्यास, याविरोधात लोकशाही आणि सनदशीरमार्गाने जनआंदोलन उभे करु, वेळप्रसंगी उपोषणही पुकारण्यात येईल, असा गंभीर इशारादेखील महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, पत्राच्या शेवटी दिला आहे.**

---



*'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, दि. २१ फेब्रुवारी-२०२४ रोजी, खासदार श्री. राजन विचारे यांच्या निधीतून उभारलेल्या, ठाणे शहरातील नौपाडा परिसरात असलेल्या, जेष्ठ नागरीक पालक-बालक कट्ट्याला भेट दिली, त्यावेळी आयोजकांतर्फे त्यांचा शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नौपाडा विभागप्रमुख श्री. प्रकाश पायरे, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा अध्यक्ष श्री. राजेश गडकर आणि दोन्ही पक्षांचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.*



# असा घडवला भाजपाच्या गुंडांनी सुसंस्कृत पुण्याच्या रस्त्यावर हैदोस

पोलीस क्लिअरन्ससाठी आम्ही तीन तास वाट बघितली. नंतर संध्याकाळी ७ वाजता मात्र वागळे सरांनी पोलीसांना सांगितलं की एकतर आम्हाला अटक करा नाही तर सभेला जाऊ द्या. वागळे सर गाडीत बसले. त्यांच्या एका बाजूला असीम आणि एका बाजूला मी बसलो. ॲड. श्रीयाला असीमनं पुढे बसवलं, गाडी identify होऊ नये म्हणून. ड्रायव्हिंगच्या वैभव बसला ज्याच्या ड्रायवींग कौशल्यामुळे आम्ही काल वाचलो. आमचा बहाद्दर साथी बाळकृष्ण निढाळकर रस्त्यावर गाडी समोर पळत होता आणि गाडी कुठून घ्यायची ते सांगत होता. सुमाराला आमची गाडी पुणे आणि मागे साध्या वेशातल्या पोलीसांची गाडी असा प्रवास सुरू झाला.

**पहिला हल्ला प्रभात रोडला इराणी कॅफेजवळ झाला. मोटार सायकलवर आलेल्या भाजपच्या गुंडांनी आणि त्यांच्या रस्त्यावरच्या साथीदारांनी गाडीवर दगड आणि अंडी फेकली. गल्ली क्र. ४ मध्ये ते दबा धरून बसले होते. आमच्या कारच्या बाजूला ते मोटार सायकलवर होते.**

थोडे पुढे म्हणजे प्रभात रोड जिथं कर्वे रोडला जोडतो तिथं भाजपाचे आणखी २५-३० गुंड उभे होते. त्यांनी आमची कार अडवून गाडीवर काठ्या आणि रॉड मारत काचा फोडायला सुरूवात केली. पोलीसांची तयांची धुमश्चक्री झाली. साध्या वेशातल्या पोलीसांवरही भाजपचे हे गुंड हात चालवत होते हे आम्ही बघत होतो. दरम्यान कारच्या समोर धुमश्चक्री होत होती म्हणून बाळकृष्ण आणि काही पोलीसांनी आम्हाला गाडी रिवर्समध्ये घ्यायला लावली. **आम्ही कर्वे रोडवरून कोथरूडच्या दिशेनं निघालो. भाजपाचे गुंड आमचा फिल्मी स्टाईलमध्ये पळत आणि मोटार सायकलवर फिल्मी स्टाईल पाठलाग करायला लागले. वैभवनं त्यांना एसेम जोशी पुलावर चकवा दिला आणि गाडी वैकुंठमधून काढली. तोपर्यंत ते शास्त्री रस्त्यावरून आले आणि सेनादत्त पोलीस चौकीच्या सिग्नलवर त्यांनी आम्हाला गाठलं. मात्र तिथं स्वतः प्रशांतदादा जगताप आणि त्यांचे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आमच्यासाठी उभे होते. त्याच वेळी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, शिवसेनेचे सुनील मोरे, गजानन थरकुडे आणि ओरिजनल**





**शिवसैनिक, राहुल डंबाळे यांचे कार्यकर्ते, आंबेडकरी कार्यकर्ते, युक्रांदचे जांबवंत मनोहर आणि सर्व कार्यकर्ते तसंच विविध पुरोगामी संघटनांचे कार्यकर्ते सभास्थळी आमच्यासाठी छातीचा कोट करून उभे होते.**

त्यांनी आम्हाला शेवटचं गाठलं ते दांडेकर पुलाच्या सिग्नलला. तिथं राष्ट्रवादीच्या भक्ती कुंभार नावाच्या रणरागिणीनं त्यांना अडवायचा प्रयत्न केला. त्यात त्या आणि त्यांचा तीन चार महिला साथी जखमी झाल्या. भाजपच्या गुंडांनी त्यांनाही मारलं. इतके निर्ढावलेले गुंड सत्ताधारी पक्षात आहेत ही शरमेची गोष्ट आहे.

**मोठमोठे दगड मारल्यामुळे गाडीच्या मागच्या काचेचा चक्काचूर झाला होता. तिथून हे भाजपचे गुंड, रॉड आत टाकण्याचा प्रयत्न करत होते. असीमनं वागळे सरांचं डोकं खाली धरून ठेवलं आणि आम्ही तिघंही डोकं खाली करून लागणार नाही असे बसलो होतो.**

**वैभवनं प्रयत्नांची शर्थ करून गाडी दामटली. वास्तविक पाहता समोरची काच अंड्यांमुळे संपूर्णतः blind झाली होती तरीही या पठ्ठ्यानं वेगात आणि रस्त्यावरच्या कोणालाही जखमी न करता गाडी साने गुरूजी स्मारकात पोहोचवली. तिथं शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर आमची वाट पहात होते. आम्ही पोहोचल्यावर त्यांनी महात्मा गांधी की जय, बाबासाहेब आंबेडकर की जय अशा घोषणा दिल्या.**

भाजपाच्या गुंडांचा हा रस्त्यावरचा थरार आम्ही तब्बल पंचवीस मिनिटं अनुभवला. आपण मेल्यात जमा आहोत असं तीन प्रसंगी वाटलं. कल्पना करा की, चाळीस ते पन्नास लोक काठ्या, रॉड, दगड घेऊन पाचजणांचा पाठलाग करत आहेत.

**भाजपाच्या गुंडांनी रस्त्यावर दहशत निर्माण केली. आसपासचे लोक भयचकित होऊन हा राडा पहात होते. रस्त्यावर इतरही आयाबहिणी असतांना हे भाजपाचे गुंड वागळे सरांच्या नावानं अर्वाच्य शिव्या जोरजोरात देत होते. वागळ्याला खाली खेचा असं जोरजोरात बोंबलत होते. रस्त्यावर सामान्य माणसं भयभीत होऊन त्यांना जागा करून देत होती. एखाद्या गुंडागर्दीवाल्या सिनेमाचं दृश्य भाजपच्या गुंडांनी सुसंस्कृत पुण्याच्या रस्त्यावर करून दाखवलं.**

सभागृहात वागळे सर आणि पोहोचल्यावरचा जल्लोष आम्ही कधीही विसरू शकणार नाही असा होता. आमचं बळ शतपटीनं वाढलं.

हे पुण्यात होतंय यावर आमचा अजूनही विश्वास बसत नाही. दरम्यान पोलीसांना 'भाजपाच्या गुंडांना हात लावू नका' असा आदेशच वरून आला असावा म्हणून त्यांनी एकाही गुंडाला ना अटक केली ना गुन्हा नोंदवला आहे.

**रात्री उशिरा घरी आल्यावर फडवीसांची प्रतिक्रिया पाहिली ती अतिशय धक्कादायक होती. 'कायदा सुव्यवस्था कोणीच मोडू नये, ज्यांनी हे केलं त्यांना शिक्षा होईल पण, उच्चपदस्थ नेत्यांबाबत बोलतांना नीट बोलावं' असा त्यांच्या प्रतिक्रियेचा आशय होता. थोडक्यात काय तर मोदी शहांबद्दल बोलाल तर यापुढे भाजपचे गुंड कोणालाही रस्त्यावर मारतील असा इशारा ते आपल्यालाच देत आहेत.**

भाजपच्या उच्चस्तरीय नेत्यांच्या मूकसंमतीशिवाय एवढा मोठा हल्ला भाजपचे गुंड करतील असं मला अजिबात वाटत नाही. निदान नाटक म्हणून तरी दोन चार गुंड पकडले असते; पण, पोलिसांवर एवढी दहशत आहे की त्यांनी एकाही गुंडाला, अगदी त्यांच्या अंगावर जाणाऱ्या गुंडांच्याही अंगाला धक्का लावला नाही. हे सगळं धक्कादायक आहे आणि आम्ही या विरूद्ध सतत लढत राहू. निखील वागळे सरांच्या धैर्याला मानाचा मुजरा.

**मोदी शहांच्या नेतृत्वाखाली फडणवीसांनी महाराष्ट्र गुंडगिरीत बिहार आणि उत्तर प्रदेशाच्या पुढे नेऊन ठेवला आहे. कुठे यांच्या पक्षाचा तालुकाध्यक्ष वक्त्याचा माईक हिसकावून घेतो, कुठे यांचा आमदार पोलीसांसमोर एका व्यक्तीवर सहा गोळ्या झाडतो, कोणीतरी घोसाळकर नावाच्या तरुणाला फेसबुक लाईव्ह करत मारतं तर पुण्याच्या सुसंस्कृत रस्त्यांवर भाजपचे गुंड निखील वागळे नावाच्या ६६ वर्ष वयाच्या पत्रकाराला मारण्यासाठी रस्त्यावर राडा करतात. या घटनेचे सगळे व्हीडीओ मिडीयावर उपलब्ध आहेत. पाहून खात्री करा.**

**हात बांधलेले पोलीस आणि रस्त्यावर राडा करणारे भाजपाचे गुंड. महाराष्ट्रातलं हे गुंडाराज तुमच्या समोर जसं पाहिलं तसं मांडलं. पुढचा निर्णय तुम्हीच घ्या.**

***...विश्वंभर चौधरी यांची फेसबुक पोस्ट***



*''भारतीय-अध्यात्माचं एक मूर्तिमंत प्रतिक...अतिशय देखणं, राजबिंडं व विशाल अंतःकरणाच्या गाभाऱ्यात समईसारखं तेवणारं मंद-पवित्र तेज, हृदयाच्या अंतर्हृदयातून उसळत चेहऱ्यावर फाकलेलं...!!!''*

*...राजन राजे*

# धर्मातल्या अन्याय्य रुढी परंपरा

**सहा-सात वर्षांपूर्वीची गोष्ट. जावेद हबीब या प्रसिद्ध केशरचनाकाराची एक जाहिरात भारतभरातल्या वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झाली. देवी दुर्गा त्याच्या केशकर्तनालयात केस कापून घ्यायला, मेकअप करायला आल्याचं त्यात चित्र होतं. दुर्गापूजेच्या निमित्तानं ती जाहिरात केली होती. जाहिरात प्रसिद्ध होताच देशात अनेक ठिकाणी पोलिसात तक्रारी नोंदल्या गेल्या. गंमत म्हणजे, बंगालात या जाहिरातीबद्दल कोणालाच आक्षेप नव्हता. माझ्या काही बंगाली मित्रांकडे दुर्गापूजेच्या वेळी प्रकाशित होणारे जुने अंक होते. आपल्याकडे दिवाळी अंक असतात, तसेच. त्या अंकांची मुखपृष्ठं मला फार आवडत. त्यात देवी कधी गळ्यात झोकदार मफलर घालून, उघड्या छताची कार चालवत, मागच्या सीटवर आपल्या दोन मुलांना घेऊन बंगालात माहेरी येई. कधी ती अणुशास्त्रज्ञ असे. तर कधी चक्क पूरग्रस्त. ही देवी म्हणजे घरची मुलगी. माहेरवाशीण. तिचं रूपही आपल्याला हवं तसं प्रेमळ. माझे मित्र म्हणाले, ती आमची माहेरवाशीण. करवून घेतला मेकअप तर काय बिघडलं? पण अनेकांना, बंगालबाहेरच्या, हे आवडलं नाही. जावेद हबीबनं माफी मागितली.**

या घटनेनंतर एका ज्येष्ठ मैत्रिणीशी बोलत होतो. ती म्हणाली, बरोबरच आहे, काढावी कशा अशी चित्रं? मी म्हटलं, त्यांच्यात परंपरा आहे. ती म्हणाले, असेल, त्यांनी इतरांचाही विचार करावा. कोणाच्या भावना दुखावणार नाहीत, अशीच चित्रं काढावीत.

नंतर अलाहाबादला, भोपाळला आणि अजूनही कुठेकुठे दुर्गापूजा पंडालांविरुद्ध तक्रारी सुरू झाल्या. तिथे नवरात्रात मांसाहारी पदार्थ विकतात म्हणून. दुर्गापूजेच्या काही दिवसांत मांसाहार करणं हेही परंपरेला धरुनच आहे. पण आपली तीच परंपरा एकमेव, असा समज झाल्यावर शहाणपण चालत नाही. गेल्या वर्षी पुण्यात एक खाद्यअभ्यासक माझ्याशी वाद घालत राहिले... दुर्गापूजेत मांसाहार नसतोच. अनेक ब्लॉग वगैरे वाचून त्यांनी ज्ञान मिळवलं असल्यानं मी मग त्यांना 'बरं, असेल' असं म्हटलं.

आपल्या घराबाहेर, गावाबाहेर, राज्याबाहेर, देशाबाहेर एक जग आहे, त्यात अनेक माणसं राहतात. त्यांचे आहार, वेशभूषा, भाषा, विचार करण्याची पद्धत यांत नक्की फरक असणार, असतो. हा फरक मान्य करण्याची क्षमता आपण नक्की कधी गमावून बसलो?

माझे मित्र, त्यांची धाकटी भावंडं अनेकदा उर्मट भाषेत मला प्रश्न विचारतात, तू ब्राह्मणांबद्दल लिहितोस, हिंदूंबद्दल लिहितोस, 'त्यांच्याबद्दल' लिहून बघ. हे 'ते' अर्थातच बदलत राहतात. मला हे प्रश्न विचारणारे सुशिक्षित आहेत. मोठे दवाखाने वगैरे असलेले. आयटी कंपन्यांमध्ये काम करून जगभर हिंडणारे वगैरे. यांची मुलं नथुराम गोडसेचे आभार मानतात तेव्हा, यांना कमीपणा कसा वाटत नाही? आपली जात, आपला धर्म पुढे बघणारे असावेत, त्यात इतर घटकांवर, दुर्बळांवर अन्याय करणाऱ्या बाबी असू नयेत, ही त्यांची अपेक्षा का नसावी? इतर धर्मातल्या अन्याय्य रुढी त्यांना हिंदूधर्मातही का हव्या आहेत?

गेल्या काही महिन्यांत, म्हणजे 'अन्नपूर्णी' सिनेमाच्या वादानंतर मुख्यत:, ईशनिंदा कायद्याच्या कठोर अंमलबजावणीची मागणी अनेकदा वाचली. मला भीती वाटली. इराण, अफगाणिस्तान, सीरिया वगैरे देशांत या कायद्यानं अनेकांचा बळी घेतला आहे. आपल्याकडेही कायद्यानं ब्लास्फेमी ही शिक्षा आहेच. पण 'कठोर अंमलबजावणी' म्हणजे काय? भरचौकात फाशी?? आपल्या देशाचा इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान करण्याची एवढी घाई का आहे?

**लोकांच्या भावना दुखावणं काही नवीन नाही. पण या भावनांची कदर करत जगन्नाथ शंकरशेठ, सावित्रीबाई – ज्योतिबा, रानडे, आगरकर, धोंके आणि रधों कर्वे, महर्षी शिंदे, भाऊराव पाटील लोकानुनय करत राहिले असते तर? या लोकांनी इतरांच्या भावनांचा विचार न करता अन्यायाविरुद्ध लढा दिला, म्हणून आज आपण जरा सुस्थितीत आहोत. फुले दांपत्य, रधों यांचा छळ झाला. आंबेडकरांना सोसावं लागलं. आगरकर रस्त्यात दिसले की, लोक घराच्या दारंखिडक्या बंद करत. त्यांनीच उभारलेल्या शाळाकॉलेजातली मुलं आज धर्मावरून, जातीवरून. लिंगभावावरून राजरोस ट्रोल करतात.**

ओसाडवाडीचे देव लिहिणाऱ्या चिंविंचं आजच्या लोकांनी काय केलं असतं? अत्र्यांनी केलेल्या त्यांच्या नाटकासिनेमाच्या जाहिराती या लोकांनी बघितल्या तर काय होईल? किंवा, आगरकर-फुले यांचे लेख वाचले तर? 'अरे, पण त्यांनी असा नमाज दाखवलाच का?' असं विचारणाऱ्या मित्राला 'जाने भी दो यारों' चालतो का?

उदारमतवादाची सगळी फळं मनसोक्त चाखून आपण 'लोकांच्या भावना जपाव्या' असा जप करतो, तेव्हा आपणही आपलं स्वातंत्र्य कमी करवून घेत असतो. समाज आणि संस्कृती यांच्या विकासाच्या दोर्या कापत असतो.

**देवदेवता, मांसाहार यांवरून भावना दुखावून घेणाऱ्यांना अर्थातच शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या बजेटमधली कपात चालते. बदलत्या अभ्यासक्रमातले धोके त्यांना दिसत नाहीत. वाढता वैद्यकीय खर्च त्यांना चालतो.**

विद्यापीठांमध्ये विद्यार्थी रोज कॅमेऱ्यानं प्राध्यापकांचं चित्रण करतात. आपल्याला, आपल्या पक्षाला, संघटनेला नावडता विचार आला की, तक्रार नोंदवली जाते. आपले विद्यार्थी, आपली मुलं असहिष्णू होत आहेत, याचं कोणालाच कसं काही वाटत नाही? विद्यापीठांमध्ये विचारांची मुक्त देवाणघेवाण असावी. त्याशिवाय शिक्षण कसं होणार? पण हे विद्यार्थी शाळेत इतिहास-नागरिकशास्त्र शिकतच नाहीत. धड विज्ञानही शिकत नाहीत. शिकवणीवर्गांमध्ये फक्त प्रश्न, गणितं कशी सोडवायची हे शिकवतात. विषय शिकवत नाहीत. प्रश्न विचारण्याची सवयच नसते. घराबाहेरचं जग माहीत नसतं. माहीत करून घेण्याची असोशीही नसते. त्यात तथाकथित धर्माभिमान आणि देशाभिमान जागृत करणारे व्हिडिओ सतत समोर आदळत असतात.

'देशाभिमान' जागृत करणाऱ्या एका यूट्यूबर जोडप्याची मुलाखत मला अतिशय आदरणीय असणारे एकजण घेणार असल्याचं वाचून मला खूप वाईट वाटलं. देशाभिमान म्हणजे नक्की काय? शिरा ताणताणून या देशात राहणाऱ्या काही समूहांबद्दल घृणा निर्माण करणं? इतर देशांना शिव्या घालत आपणच कसे भारी हे सांगणं? इतिहासाचा विपर्यास करणं? त्या इतिहासाला चिकटून आज इतरांना मारहाण करणं?

वर्तमानपत्रं, समाजमाध्यमं या प्रतिगामी आचरणाला, हिंसाचाराला पाठबळ देतात. 'नवऱ्यानं सांगूनही तिने ऐकले नाही, मग नवऱ्याने केला करेक्ट कार्यक्रम' अशी एका खुनाची बातमी एवढ्यात एका वर्तमानपत्रानं दिली होती. एरवी रसिक म्हणून मिरवणाऱ्या संपादकांना अश्या बातम्या खटकत नाहीत. हिंसेविषयी आपण बधीर झालो आहोत.

**शाळेत शिकत वगैरे असताना, फारसं वाचन वगैरे नसताना राष्ट्रवाद मिरवणारे अनेक असतात. पुढे वाचन वाढल्यावर, जग बघितल्यावर या राष्ट्रवादाची धार बोथट झाली नाही, तर समाज नासतो. इराण, अफगाणिस्तान वगैरे देशांतले काही दशकांपूर्वीचे फोटो बघितल्यावर वाटायचं, इथल्या स्त्रिया पूर्वी उघड्या डोक्यानं वावरत, रात्री हॉटेलांमध्ये जात, एवढ्या कमी अवधीत यांचा उलटा प्रवास कसा घडला? आपला उलटा प्रवास घडताना आता मला हा प्रश्न पडत नाही. असा उलटा प्रवास सुरु होणं खूप सोपं आहे, हे आता कळलं आहे. तो थांबवायचा की नाही, हे आपल्या हाती आहे.**

***चिन्मय दामले....***




*कुलाब्याचा 'आदर्श सहकारी गृहनिर्माणसंस्था' घोटाळा प्रकरण काय किंवा 'छेडा सदन'मधील मुंबई कार्यालय काय; सगळाच, भाजपा 'गुजराथी-लॉबी'चा विकारी-पातकी 'प्रभाव' आणि महाराष्ट्र-कॉंग्रेसच्या आजवरच्या राजकारणातील नीतिमत्तेचा 'अभाव'....या सगळ्याचाच परिपाक म्हणजे, अशोक चव्हाणांनी, आपल्या पित्याच्या खंबीर, निष्कलंक राजकीय-इतिहासाला काळिमा फासत मारलेली लाजिरवाणी 'कोलांटीउडी'!*

*...त्यामुळे, ते एकदम नितीशकुमारांच्या मांडीला मांड लावून बसलेत... जेपी-कर्पुरींच्या बिहारसोबतच, शिवछत्रपतींच्या महाराष्ट्राच्या इज्जत-अस्मितेची पुन्हा एकवार आज धिंड निघालीय, जशी ती यापूर्वीच, आपली कातडी बचावण्यासाठी गेल्या वर्ष-दिडवर्षात 'एकनाथ शिंदे आणि अजित पवार' या दलबदलू कंपूंनी काढलीय!*

*महाराष्ट्र-कॉंग्रेसचं आभाळचं फाटलंय...एकटे राहुल गांधी मरमर परिश्रम करुन त्याला किती टाके घालू शकणार...???*

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

# पर्यावरणाला 'धर्म' मानणारा आणि सायकलिंगवर 'राज्य'करणारा, 'धर्मराज्य पक्षा'चा निसर्गप्रेमी सायकलपटू कार्यकर्ता – संभाजी गिरी




**''भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी हरित–पक्ष'' अशी सर्वमान्य ओळख असलेल्या 'धर्मराज्य पक्षा'च्या, निसर्गरक्षण आणि पर्यावरणीय भूमिकेचा पगडा, पक्षाच्या कार्यकर्त्यांवर किती खोलवर रुजलाय, याचं ढळढळीत उदाहरण देणारी अभिमानास्पद घटना नुकतीच घडलीय. 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघ' या युनियनचा सदस्य असलेला, मुंबईतील लालजी गोधु अँड कंपनी (एल. जी. हिंग) या कंपनीतील कामगार संभाजी गिरी याने, सायकलिंगच्या माध्यमातून एक अनोखा विक्रम केलाय. ठाणे शहराचे हृदय असणाऱ्या येऊर येथे पार पडलेल्या लूप–अप सायकल स्पर्धेत त्याने, उपवन ते येऊर अशा सलग २५ फेऱ्या मारुन, 'धर्मराज्य पक्षा'च्या पर्यावरणवादी भूमिकेचा जाज्वल्य पुरस्कार केलाय.** शनिवार, दि. १७ फेब्रुवारी–२०२४ रोजी, 'घोडबंदर सायकलिस्ट' या सायकलप्रेमींच्या संघटनेच्या वतीने, येऊर येथे संपन्न झालेल्या सायकलिंग स्पर्धेत संभाजी गिरी हा हिरो ठरला आणि त्याचं सर्व श्रेय त्याने 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांना दिले. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना तो म्हणाला की, ''कामाचा व्याप आणि ओव्हरटाईम यामुळे व्यायामाला वेळच मिळत नसे. बारा–पंधरा तासांच्या कामात, ना पुरेशी झोप, न जेवणाची निश्चित वेळ, यामुळे माझी चपळता निघून गेली. जेव्हा जेव्हा आरशात स्वतः ला पाहायचो, तेव्हा तेव्हा माझं सुटलेलं पोट पाहून मला कसंतरीच व्हायचं. पंधरा–सोळा वर्षांपूर्वीचा मी, मला कुठेच दिसत नव्हतो. अशातच आमच्या कंपनीत मा. राजन राजे यांची, 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'ची युनियन झाली आणि जादूची कांडी फिरावी तसा औद्योगिक चमत्कार घडला. कामगारांचे पगार चांगलेच वाढले, ओव्हरटाईम बंद झाले. यामुळे पुरेसा वेळ शिल्लक राहू लागला. जिथे पूर्वी बारा ते पंधरा तास काम करावं लागत होतं, तिथे आता आठ तासांची शिफ्ट झाली. मुळात, आम्हा कामगारांची जी काही पिळवणूक सुरु होती, ती थांबली... आता, व्यायामासाठी वेळ मिळू लागला. सुरुवातीला चालायला सुरुवात केली, पण पायाला भेगा पडू लागल्या. त्यामुळे सायकलिंगचा पर्याय निवडला. उपवनला 'समर्पयामी' या ठिकाणी आदित्य भवनदास (काका) आणि मयुरेश सर यांची भेट झाली. सायकल तर विकत घ्यायची होती, पण तेवढे पैसे नव्हते. अशावेळी त्या दोघांनी हप्त्यावर सायकल मिळवून दिली आणि माझी सायकलिंग खऱ्या अर्थाने सुरु झाली. सुरुवातीला एक लूप मारताना, चारवेळा तरी थांबावे लागायचे; मात्र, सर्व सायकलिस्ट प्रोत्साहन द्यायचे. यामुळे माझी चांगली तयारी होत होती. याच दरम्यान, दि. २५ जानेवारी–२०२४ रोजी, महेश दाभोळकर यांच्या ग्रुपसोबत ऐरोली ते गेट वे ऑफ इंडिया अशी नाईट राईड केली. आता माझा आत्मविश्वास हळूहळू वाढत होता. त्यातच सतीश जाधव यांचे सायकलिंगचे फोटो ग्रुपवर यायचे. ते वाढत्या प्रदूषणाविषयी सांगायचे. त्यांनी सायकलवर भारतभ्रमण केल्याचे ऐकले होते. 'धर्मराज्य'सारख्या पर्यावरणवादी पक्षाचा कार्यकर्ता व कामगार सदस्य असल्यामुळे, मी अधिकच प्रभावित झालो. काही दिवसांनी माझ्या विनंतीला मान देऊन, सतीश जाधवांनी मला त्यांच्यासोबत सायकलिंग करीत नाशिकला नेले. **ही गोष्ट आदित्य भवनदास (काका) आणि मयुरेश सरांना समजली. त्यांनी तिसऱ्याच दिवशी येऊर चॅलेंज स्पर्धेत माझं नावही नोंदवलं. माझे पाय दुखत होतेच, पण त्यांनी आत्मविश्वास देत, ''तू करु शकतोस'' एवढंच म्हटलं आणि मी त्या स्पर्धेत सहभाग घेतला. अखेर, त्या दिवशीच्या स्पर्धेत उपवन ते येऊर असे सलग २५ लूप्स मारले आणि माझ्या नावावर एक विक्रम नोंदविला गेला. याचं सर्व श्रेय हे, माझे नेते मा. राजन राजे, सायकलिंगमधले माझे मार्गदर्शक आणि सहकारी आदित्य भवनदास (काका), मयुरेश सर, शरद भुवड, महेश दाभोळकर, सतीश जाधव यांना जाते. योगायोगाने कार्यक्रमाची सांगता होत असतानाच, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष सचिन शेट्टी त्याठिकाणी आले. भवनदास काकांनी त्यांना सांगितलं की, हा लालजी गोधु कंपनीचा कामगार आहे. मग, त्यांनी मला जवळ बोलावलं आणि थेट भाईंना फोन लावला. माझ्यासाठी तो फार मोठा आनंदाचा क्षण होता. कारण माझे भाग्यविधाते, माझे नेते, आदरणीय राजन राजे माझ्याशी बोलले. त्यांनी मला व्हिडीओ कॉलवरुनच शाबासकीची थाप दिली. भाईंना मी म्हणालो, आज मी जो काही रेकॉर्ड केलाय, तो केवळ तुमच्यामुळेच. नाहीतर आजही कंपनीच्या ओव्हरटाईममध्येच अडकून पडलो असतो. तुमची शाबासकी हीच माझी आयुष्यभराची शिदोरी आहे.** आज मा. राजन राजे यांच्या नेतृत्त्वामुळेच, मी गुलामगिरीतून मुक्त होऊन, स्वच्छंदपणे सायकल–विहार करतोय. यात फक्त भाईंच्या 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'ने आम्हाला उत्तम पगार व बोनस मिळवून दिल्याने, आमच्या जगण्यातच क्रांती आली आणि अशा आवडीनिवडींना, छंदांना वेळ देणं शक्य होऊ लागलं... अन्यथा, पूर्वीसारखेच बारा–बारा, सोळा–सोळा तास काम करीत (ओव्हरटाईम) आमच्या संसाराची गोधडी शिवत बसण्याचं काम करीत आजही राहिलो असतो !'' अशा शब्दांत संभाजी गिरी याने आपल्या भावना बोलून दाखवल्या. संभाजीच्या या 'शिव'पराक्रमामुळे, 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यकर्ते आणि 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे कामगार सदस्य यांना नक्कीच प्रेरणा मिळेल. भाईंच्या म्हणण्यानुसार, कॅरम हा खेळ जसा मराठी माणसाच्या रक्तात उतरलेला आहे, तसाच सायकलिंग हा क्रीडा अधिक व्यायाम प्रकारदेखील मराठी माणसाच्या धमन्यांमधून वाहतोय असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

---

*भाईंचे कट्टर समर्थक उमेश धुमाळ (मौजे–कोरावळे, ता. मुरबाड) यांच्या आजोबांचा (गंगाराम लकडू धुमाळ) ९० वा वाढदिवस थाटामाटात 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांच्या हस्ते साजरा करण्यात आला...त्याप्रसंगीची क्षणचित्रे! याप्रसंगी, बोलताना भाई म्हणाले, ''आधुनिक जीवनपद्धतीमुळे शहरातले हृदयविकार, मधुमेह, कर्करोगासारखे गंभीर आजार आता महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून घुसले असून आमचं ग्रामीण–आरोग्य धोक्यात आलंय. तेव्हा, साठीपर्यंत तारुण्य, साठी ते पंचाहत्तरीपर्यंत प्रौढत्व, त्यानंतर नव्वदीपर्यंत म्हातारपण व पुढे जर्जर म्हातारपण...असा आपल्या आयुर्वेदाने सांगितलेला जीवनपट पूर्ण करणं, हल्लीच्या जगात किती जणांच्या नशिबी असतं? अहो, रिलायन्सच्या धीरुभाई अंबानींना एवढा पैसा हाती असताना वयाची सत्तरी तरी गाठता आली? 'सुखी माणसाचा सदरा' धारण करणारी आमची भूमिपुत्र 'आगरी–जमात' कोरावळ्यासारख्या खेड्यांतून आपली एकत्र–कुटुंब पद्धत जपताना पाहिल्यावर मनस्वी आनंद होतो. आपल्या आईबापाला न विचारणारी ''मराठी लेकुरे, महाराष्ट्रात उदंड झाली'' असताना...उमेश धुमाळसारखा तरुण उत्साहाने आपल्या आजोबाची नव्वदी साजरी करतो, हे फार विशेष कौतुकास्पद आहे.''*



# संसार का सबसे पीड़ित जीव!

कभी मुर्गी फॉर्म देखे हैं? गाँव देहात के मुर्गी फार्म में बाहर के फर्म से चूजे मंगाए जाते हैं। ये चूजे बन्द कार्टन में भर कर आते हैं। ठीक वैसे ही, जैसे फल, मिठाई, कपड़े आदि एक जगह से दूसरे जगह ले जाये जाते हैं। अंतर बस इतना है इस कार्टन में जीवित बच्चे पैक किये जाते हैं।



**मुर्गी फर्म में डालने के पहले इन चूजों की चोंच काट दी जाती है। जानते हैं क्यों? मुर्गियों की चोंच नुकीली होती है। फर्म में थोड़ी सी जगह में ही ढेरों मुर्गियों को रहना होता है। जगह इतनी कम होती है कि एक पर एक चढ़ी हुई मुर्गियां अपना मुंह हिलाएं तो भी एक दूसरे को नोच देंगी। तो इससे बचने के लिए उनकी चोंच की नोक ही काट दो... कितना सुंदर तरीका है न?**

फार्म वाले का लक्ष्य होता है कि पाँच छह सप्ताह में मुर्गी डेढ़ किलो की हो जाय। यह प्राकृतिक रूप से सम्भव नहीं होता। डेढ़ किलो का होने में देशी मुर्गी को लगभग दो वर्ष लगते हैं। पर मुर्गी फार्म वाले के पास इतना समय नहीं होता न... तो वह ऐसी परिस्थिति उत्पन्न करता है कि मुर्गियां लगातार खाती रहें।

अगर आप कभी रात के समय मुर्गीफार्म के आसपास से गुजरे तो देखेंगे, वहाँ लाल रंग की तेज रौशनी चमक रही होती है। यह तेज रौशनी फर्म की मुर्गियों को सोने नहीं देती... वे लगातार दाना चुगती रहती हैं। आप सोच कर देखिये, किसी जीवित प्राणी से उसकी नींद छीन लेना कितना पीड़ादायक होगा! अधिकांश मुर्गियों की आंखें इसी दौरान पूरी तरह खराब हो जाती हैं।

**चार से पाँच सप्ताह की होते होते मुर्गियों का वजन एक किलो के आसपास हो जाता है। अब फर्म में इतनी भी जगह नहीं होती कि मुर्गियां उछल भी सकें। एक दूसरे पर चढ़ी हुई, दबी हुई मुर्गियों का जीवन नर्क से भी बदतर होता है। ठसाठस भर चुके फर्म की अब सफाई भी सम्भव नहीं होती, सो मुर्गियां अपने ही मलमूत्र पर बैठती हैं और धीरे धीरे मल को भी खाने लगती हैं। आप यदि फर्म की मुर्गियों को देख लें तो शायद ही अपनी उल्टी रोक सकें...**

इसी समय मुर्गीफार्म में बीमारी फैलती है। सामान्यतः लोग समझते हैं कि मुर्गियों में वायरल बीमारियां फैलती हैं, पर सच अलग है। अधिकांश मुर्गियां गंदगी के कारण, अपना ही मलमूत्र खाने के बीमार होती हैं।

**खैर! धीरे धीरे छह सप्ताह बीतते हैं और उनकी मुक्ति का दिन आ जाता है। एक दिन उन्हें फर्म से निकाल कर एक दूसरे दबड़े में भरा जाता है और कसाई की दुकान पर पहुँचा दिया जाता है। यह पहला मौका होता है जब मुर्गी अपने फर्म की के बदबूदार माहौल से बाहर खुली हवा में सांस ले पाती है। पर यह मृत्यु से ठीक पहले की स्थिति है साहब...**

**गाँव देहात के फर्म से कसाई खुद मुर्गियों को ले आता है। जानते हैं कैसे? मोटरसाइकिल के पीछे एक लाठी बांध दी जाती है और उस लाठी में मुर्गियों के पैर बांध कर उन्हें उल्टा लटका दिया जाता है। कसाई उसी तरह उल्टा लटका कर उन्हें दस बीस किलोमीटर दूर अपने दुकान तक ले आता है। दुकान तक पहुँचते पहुँचते उल्टा लटकी मुर्गियों के मुँह से खून टपकने लगता है। कुछ मुर्गियां मर भी जाती हैं। जो मर जाती हैं उन्हें पहले काट दिया जाता है और दस बीस रुपये सस्ते में बिक जाता है मांस!**

हमारे आपके जैसे सामान्य लोग जो मुर्गियों को कटते देख कर द्रवित हो जाते हैं न! यकीन कीजिये, उनका जीवन उनकी मृत्यु से हजार गुना अधिक कष्टप्रद होता है। जन्म से लेकर मृत्यु तक हर क्षण मर्मान्तक पीड़ा से भरा होता है। जीवन के संघर्ष और स्वाद के लोभ में मनुष्य पहले भी क्रूर था, पर इतना नहीं...

बस यूं ही...

*...सर्वेश तिवारी श्रीमुख*
गोपालगंज, बिहार।



म्हणूनच, आम्ही आमच्या मुरबाडच्या शेतघरावर गावठी-देशी कोंबड्या कापल्या जाईपर्यंत वा मरेपर्यंत अगदी सुखेनैव चरत ठेवल्या जातात...त्यांच्या नैसर्गिक आहारविहारात आम्ही कुठलाही व्यत्यय तर आणत नाहीच; उलटपक्षी त्यांचं मुंगूस, साप, कुत्रे, कोल्हे, कावळे-घारी-बहिरी ससाणे, बिबळ्यांपासून मेहनत घेऊन व खर्च करुन संरक्षण करतो. सहसा आम्ही मादी कोंबड्या कापून खात नाही (त्यांचा अखेरपर्यंत अंडी उबविण्यासाठी व पिल्लं वाढवण्यासाठी यथास्थित उपयोग करुन घेतला जातो...पिल्लं अधिकची जन्माला घालण्यासाठी उबवणी-संयंत्राचा प्रसंगी वापर करुन नूतन पिल्ले खुडूक धरलेल्या अथवा अंड्यातून पिल्लं जन्मलेल्या कोंबडीच्या पंखाखाली ठेवली जातात किंवा प्रसंगी स्वतंत्रपणे वाढवली जातात), फक्त नर कोंबडेच कापून खातो. त्यांना कुठलंही रासायनिक कृत्रिम खाद्य किंवा संप्रेरकांची (Harmones) इंजेक्शन्स वगैरे बिलकूल देत नाही. मोकाट पद्धतीने पालन करताना त्यांचं मुंगुसांपासून संरक्षण करण्यासाठी जागोजागी कुत्रे झाडाखाली बांधून ठेवतो व शक्य झाल्यास कोल्ह्यांचा ध्वनिमुद्रित आवाज (मुंगूस, हे कोल्ह्याचं आवडतं खाद्य आहे) अधूनमधून तारस्वरात चालू ठेवतो, जेणेकरुन मुंगूस कोंबड्यांच्या जवळपास बिलकूल फिरकत नाहीत. अशातऱ्हेनं, कोंबड्यांना हिंडण्याफिरण्यास मुक्तद्वार देऊन मरेपर्यंत अतिशय आनंदी जीवन जगू देण्यास हातभार लावला जातो. जंगलात संवर्धन करताना, त्यांना वरुन फारसं खाद्य (उदा. तूसासह तांदूळ म्हणजेच भात वगैरे) द्यावं लागतं नाही व अशा परिपूर्ण नैसर्गिक वातावरणात वाढणाऱ्या कोंबड्यांना कुठल्याही प्रकारच्या लसी न टोचताही त्या रोगराईपासून चांगल्यापैकी मुक्त रहातात (त्यादृष्टीने पहाता, देखभाल खर्च किंवा Input Cost एकदम कमी होते). चुकूनमाकून आजारी पडलेल्या कोंबड्यांना तत्काळ दुरच्या वेगळ्या पिंजऱ्यात ठेवलं जातं व त्या रोगाने व सापविंचू चावल्याने वगैरे मेल्यास, त्यांना जीवो जीवस्य जीवनम्, या सूत्रानुसार, वरुन टांगून चुलाणावर व्यवस्थित भाजून काढलं जातं...ते मांस कुत्र्यांचं उत्तम पौष्टिक-खाद्य बनून जातं.

रात्री झोपण्यासाठी जाळीबंद मोठा पिंजरा व मुंगूसांना बिळ करुन पिंजऱ्यात आत शिरता येणार नाही; अशापद्धतीने खास तीन इंचाची काँक्रिटची 'पडदी', कडक मुरुम लागेपर्यंत खोलवर जाळीखाली रचून ठेवलेली आहे. अशा हवेशीर व रात्रीच्या किर्रर वातावरणात निवांतपणे कोंबड्या मनसोक्त झोप घेतात व त्या सकाळीच कुत्रे बांधून ठेवल्यावर मोकळ्या सोडल्या जातात. दिवसभर चरुन, संध्याकाळपर्यंत त्या बरोबर सवयीने पिंजऱ्यात व्यवस्थित अचूक येऊन बसतात (झाडावर वगैरे सहसा बसत नाहीत).

अशाचप्रकारे, आपण देशी गुरं (विदेशी जर्सी किंवा होलस्टिन गायी नव्हे) मोठ्या कुंपणाआत 'मोकाट पद्धती'नेच पाळतो. या सर्व प्राणिमात्रांना आपल्या आयुष्यक्रमात अखेरपर्यंत आनंदाने जगताना पहाणं, हे एक लोकविलक्षण समाधान होय!

*...राजन राजे*

गांधीहत्येच्या कटात सावरकरांना सुरुवातीला अटक झाली होती. परंतु, पुराव्याभावी त्यांची नंतर सुटका झाली तरीही, समाजाने त्यांच्यावर बहिष्कारच टाकला होता. नंतरही त्यांनी समाजासाठी कोणतेही भरीव कार्य केले नाही, असे माझे वडीलही सांगत.

**खरोखरच, आमच्या पिढीपेक्षा आमच्या पूर्वजांना खूप तारतम्य आणि व्यावहारिक समज चांगलीच होती. कुठल्याही भुलथापांना आणि प्रोपोगंड्याला ते बळी पडले नाहीत. त्यांच्यामुळेच हा देश स्थिरस्थावर झाला आणि अवघ्या काही वर्षांतच प्रगतीच्या दिशेने वेगाने झेपावला.... असो.**

**गांधी–नेहरु–पटेल हे तिघेही हिंदू असूनही त्यांनी अपरिहार्यपणे फाळणीचे वास्तव स्वीकारले. तसेच ते बहुसंख्य भारतीय नागरिकांनीही 'सरफरोश' या चित्रपटाच्या शेवटी आमिर खानने हे वास्तव अतिशय परखडपणे मांडले आहे.**

हिंदूराष्ट्र निर्मितीच्या आवेगाने झपाटलेल्यांनी गांधींऐवजी, निजाम/नबाब किंवा काश्मीरच्या विलिनीकरणाला सुरुवातीला ठाम नकार देणाऱ्या महाराजा हरीसिंह किंवा मग खुद्द बॅ. जीनांवरच कधी गोळी का नाही झाडली...???

या आणि वरील सर्वच प्रश्नांची उत्तरे शोधली तर, गांधीहत्येचे पैलू स्पष्ट होत जातात... आणि, त्यामागील पद्धतशीर नियोजनही. जर गांधी पाकधार्जिणे होते; तर, गांधीहत्येचं तुमचं समर्थन इतिहासानं आणि जगानं आपसूकच मान्य केलं असतं. पण, आज ७५ वर्षांनीदेखील तसं झालेलं नाही. तिकडे अमेरिकेत जाऊन गांधींच्या पुतळ्याचे अनावरण करणारे, नथुरामला जाहीरपणे आणि अभिमानाने का स्वीकारत नाहीत?

बराक ओबामा भारतात येऊन, आपल्याच संसदेत, गांधी आणि बाबासाहेबांची महती आपल्यालाच ऐकवतात, तेव्हा शरमिंदे होण्याशिवाय आपल्याकडे पर्यायच नसतो.

स्वतःच्या व्यक्तिमत्वावर गांधींची छाप असल्याची जाहीर कबूलीही ते देतात आणि भारताच्या Success Storyचं श्रेय सुद्धा दिलखुलासपणे या दोघांना देतात.

**मग, मित्रांनो तुम्हीच सांगा... स्वातंत्र्यदिन किंवा प्रजासत्ताक दिनाच्या ऐतिहासिक दिवशी, याच मंडळींची वेशभूषा करुन, त्यांनी दिलेल्या वारशाची आठवण नाही करायची, तर मग कुणाच्या वारशाची आठवण करायची?**

**पं. नेहरुंनी भारतमातेची केलेली व्याख्या मला नेहमीच पटते...**

**नेहरु नेहमी म्हणायचे, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेला हा विस्तीर्ण भूभाग म्हणजे भारतमाता नव्हे; तर, ही ३५ कोटी जनता म्हणजेच भारतमाता. या जनतेची, दारिद्र्य, रोगराई, दुष्काळ, निरक्षरता यापासून मुक्तता करणे; म्हणजेच, भारतमातेची सेवा नेहरु पुढे असंही कबूल करत की, ही भारतमाता माझ्या भाषणाला लाखोंनी येते पण, जयजयकार मात्र, गांधींच्याच नावाने करते!.**

आज, ही भारतमाता १४० कोटींची झाली; तरी, आजही गांधी तुम्हाला तिच्यातच पहायला मिळतील...!!!

**...रुद्रेश सातपुते**

## मधुरा स्वामिनाथन आणि 'भारतरत्न' पुरस्काराची भाजपाई खिरापत.....

एका बाजुला 'भारतरत्न' पुरस्काराची 'खिरापत' वाटणाऱ्या...आणि, दुसऱ्या बाजुला शेतकरी-शेतमजूर, कामगार, उच्चपदस्थ अधिकारीवर्गाकडून 'खच्चीकरण' करण्यात आलेला पोलीसदलातील हवालदार-शिपाईवर्ग, लष्करात भरती होऊ पहाणारी नवतरुणाई (तथाकथित, अग्निपथावरील अग्निवीर), ट्रकचालक-रिक्षावाले, सेवेतून निवृत्त झालेला समस्त कामगार-कर्मचारीवर्ग.... अशा, देशातल्या तळागाळातील सर्वच समाज-घटकांवर 'आफत' आणणाऱ्या; मोदी-सरकारचं 'मधुरा स्वामिनाथन'कृत 'वस्त्रहरण'....

या दबावतंत्राची खेळी, देशी उद्योगपतींसोबत बडे विदेशी-भांडवलदार देखील अत्यंत निर्घृणपणे खेळत असतात. इंदिरा गांधी, राजीव गांधी, मनमोहनसिंग पाकिस्तानची बेनझीर भुत्तो या चौघा राष्ट्रप्रमुखांनी, या बड्या आंतरराष्ट्रीय भांडवलदारांच्या दबावाखाली येणं नाकारलं होतं...आणि, लक्षात घ्या की, त्यातल्या तिघांच्या निर्घृण हत्या झाल्या. जी जाज्वल्य समाजहितैषी, ओपिनियन मेकर्स, पत्रकार, सल्लागार वगैरे संवेदनशील मंडळी असतात...त्यांनाही, या धोक्यांना सामोरं जावं लागतंच. आजच्या 'गोदी-मिडीया'ची निर्मितीही अशाच हिणकस, लोकशाहीविरोधी 'भांडवली-प्रक्रिये'चं अपत्य आहे. 'बळी तो कानपिळी', हे जंगलातलं रौद्रभीषण-अमानुष पाशवी-सूत्र, आपल्या जगण्यात आणणारी ही 'भांडवली-व्यवस्था', तुमचं जगणंच 'जंगलाचा कायदा' बनवून टाकते!

***...राजन राजे,*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



*ठाणे शहरातील डॅशिंग, माजी निवृत्त पोलीस अधिकारी श्री. रवींद्रनाथ आंग्रे यांनी, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची, दि. २३ फेब्रुवारी-२०२३ रोजी, पक्षाच्या ठाणे कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये राजकीय आणि सामाजिक विषयांवर सखोल चर्चा झाली, त्याप्रसंगीची छायाचित्रे...*

## ध्रुव राठीच्या अभ्यासपूर्ण व्हिडीओवरील प्रतिक्रिया...

उत्तर-दिशादिग्दर्शन करत, रात्रीच्या अंधःकारमय विश्वात अचूक मार्गदर्शन करणाऱ्या, आकाशातल्या अढळ ध्रुव ताऱ्यासारखेच भारतीय समाजाला मार्गदर्शक ठरलेल्यांपैकी एक 'ध्रुव राठी'... एखाद्या 'अग्निपथावरावरुन चालणाऱ्या अग्निवीरा'सारखा (मोदी-शाह सरकारकडून गंडवले गेलेले 'अग्निपथावरील लष्करी अग्निवीर' नव्हे!) या व्हिडीओतून... महाभारत युद्धसमयी श्रीकृष्णाने अर्जुनाला जसं विश्वरुप दर्शन घडवलं होतं... तसंच, मोदी-शाह सरकारच्या 'कॉर्पोरेट-शाही'च्या काळ्याकुट्ट अंतरंगाचं रौद्रभीषण दर्शन आपल्याला घडवतोय!

अनेकांनी हा व्हिडीओ पाहिला असेल, अनेकांकडून पहायचा राहून गेला असेल (त्यांनी तो, न चुकता आवर्जून पहावाच, ही नम्र विनंती). पण, हा व्हिडीओ संपूर्ण पाहिल्यावर ज्यांच्या मनावर काडीचाही परिणाम होत नाही, अंतःकरणात एक ओरखडादेखील उमटत नाही...उलटपक्षी, 'अंधभक्त' म्हणूनच दगडाधोंड्यासारखं 'अज्ञानी जगण्या'त किंवा 'भांडवली-व्यवस्थे'ने फेकलेल्या तुकड्यांवर 'संवेदनशून्य व स्वार्थपूर्ण जगण्या'त, जे धन्यता मानतात...ती माणसंही नाहीत आणि ती मंडळी, अगदी जनावरंही नाहीत; कारण, जनावरांनादेखील निसर्गतः किमानपक्षी काही समज-उमज, इमान व संवेदना ही असतेच!

या व्हिडीओतून अंधभक्ति करणाऱ्या सर्वसामान्य अज्ञानी लोकांसोबतच... शेतकऱ्यांच्या आंदोलनाला 'बदनाम' करु पहाणारे (यात, 'श्रीः श्रीः रविशंकर'सारखे 'सामाजिक जंत' अग्रणी आहेत... महाराष्ट्रात तर असे, लाखो अंध-अज्ञानी भक्तांची मांदियाळी बाळगणारे, 'संत' म्हणून मिरवणारे अनेक दांभिक 'संप्रदायी जंत', उदंड झालेले आपण राजरोस पहात असतोच), तथाकथित विकासपुरुष वगैरे म्हणून मिरवणारे नितीन गडकरी, 'गोदी-मिडीया'तले 'बुद्धिमान बदमाष' अँकर, अदानीसारखे उन्मत्त झालेले कॉर्पोरेटीय सुलतान-शहेनशाह... या सगळ्याच डँबिस लोकांची, जी सप्रमाण व सोदाहरण 'वरात' ध्रुव राठीने काढलीय, त्या ध्रुव राठीच्या अभ्यासपूर्ण धैर्याला, मेहनतीला व जनकल्याणाच्या तळमळीला 'धर्मराज्य पक्षा'चा त्रिवार सलाम...!!!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# आधुनिक शेती करणारा, आजचा 'अस्वस्थ भारत'

ज्यांनी, १९६०च्या दशकात भारतात 'हरितक्रांती' आणली, त्या एम. एस. स्वामिनाथनांची मुलगी मधुरा स्वामिनाथन (स्वामिनाथन-प्रतिष्ठानच्या अध्यक्षा) यांनी, आपल्या पित्याला 'भारतरत्न' मिळाल्याच्या भर सत्कार-समारंभातच...सांप्रत, शेतकरी-आंदोलनासंदर्भात घेतलेल्या जाज्वल्य भूमिकेमुळे देशात एकच खळबळ उडालीय. त्यामुळे, निव्वळ आपल्या पित्याला (चरणसिंग) व कर्पुरी ठाकुरांना 'भारतरत्न' दिल्याचं निमित्त साधून NDA कळपात शिरलेल्या जयंत चौधरी व 'पलटीमार' नितीशकुमारांना आणि श्री श्री रविशंकर (खरं म्हणजे, बसल्या जागी वातानुकूलित हॉलमध्ये, फुकाची प्रवचनं-निरुपणं झोडणाऱ्या 'शी: शी: रविशंकरा'ला उन्हातान्हात-पावसापाण्यात शेतात राबायला पाठवला पाहिजे), रामदेवबाबांसारख्या भांडवली-व्यवस्थेच्या पालखीचे भोई असलेल्या भोंदू संतांना चांगलीच चपराक बसलीय!

मात्र, या मधुरा स्वामिनाथन यांनी घेतलेल्या निरतिशय कौतुकास्पद भूमिकेसोबतच, शेतीसंबंधी थोडं चिंतन होणंही गरजेचं आहे. ''सोनखत-शेणखत-पालापाचोळा व जनावरांची विष्ठा-मलमुत्रातून निर्मिलेलं गांडूळखत आदी नैसर्गिक संसाधनं-निविष्ठा; तसेच, बैलजोडीच्या नांगराने व मूळ नैसर्गिक-बियाणे वापरुन पारंपारिक सेंद्रिय-शेती करणारा शेतकरी...आर्थिकदृष्ट्या वरकरणी गरीब भासला; तरीही, मनाने श्रीमंत असल्यामुळे आत्महत्या करण्याचा विचारही कधि त्याच्या मनात स्पर्शू शकला नव्हता. मात्र, 'नॉर्मन बोरलॉग'पुरस्कृत रासायनिक-यांत्रिक व आधुनिक तंत्रज्ञानाने बनवलेली बियाणे वापरुन केली जाणाऱ्या शेतीमुळे, यथावकाश देशात एकच हाहाःकार उडून लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ लागल्यात!''

कालचा, शरीर व मनाने निरोगी-तंदुरुस्त असलेला शेतीप्रधान-भारत... आणि, बेलगाम यांत्रिकीकरणामुळे, संकरित/GM बियाण्यांच्या; तसेच, रासायनिक खते-रासायनिक कीटकनाशकांच्या बेगुमान वापरामुळे... लाखो लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ग्रस्त झालेला, आजचा आधुनिक शेती करणारा 'अस्वस्थ-भारत'... याविषयी आपण कधि बोलणार? नैसर्गिक रोगप्रतिकारक क्षमता घटून कर्करोग (कॅन्सर), हृदयविकार, मधुमेह आदि असंख्य गंभीर आरोग्य-समस्यांनी घेरला गेलेल्या भारताबद्दल (जो आज, मधुमेह-हृदयविकार व कर्करोगादी गंभीर आरोग्य-समस्यांची 'जागतिक-राजधानी' बनू पहातोय) सातत्याने बोललं गेलंच पाहिजे, आवाज उठवलाच पाहिजे!

**विशेष उल्लेखनीय बाब ही की, अमेरिकेतून डॉ. नॉर्मन बोरलॉग यांना भारतात बोलावून घेऊन, बियाणांचा विकास, सिंचन-पद्धतींचा विस्तार, शेतीव्यवस्थापनाचं आधुनिकीकरण, संकरित बियाण्यांचं, कृत्रिम खतांचं व किटकनाशकांचं वितरण इ.च्या आधारे शेतकी संशोधन-तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतातलं कृषिउत्पादन कमालीचं वाढवत ज्यांनी, 'हरितक्रांती' घडवली... त्या, एम. एस. स्वामिनाथन या 'हरितक्रांती'च्या जनकाला स्वतःलाच, कालांतराने आपण स्वतः पुरस्कार केलेल्या आधुनिक-शेतीच्या आनुषंगिक व अंतिम गंभीर परिणामांचं स्वरुप पाहून, खूप पश्चाताप झाला होता (जसा, अणुभंजनाचं रहस्य व सूत्र शोधल्याने, अल्बर्ट आईन्स्टाईनना पुढे पश्चाताप झाला होता). 'हरितक्रांती'च्या या सत्यस्वरुप आकलनाने, ते आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात, एकूणच आधुनिक शेती-पद्धतीबाबत 'यू-टर्न' करण्याची भाषा बोलत होते...पण, आता, शेतकी-उत्पादनवाढीच्या आत्मघातकी नादानं खुळावलेल्या आपल्या देशात, त्यांचं अनुभवजन्य-कथन ऐकणारे कानच शिल्लक राहीले नव्हते! म्हणूनच, देशातील आजचं शेतकी-वर्तमान, प्रचंड आंदोलित आहे, आत्महत्याग्रस्त आहे व देशातील शेतकऱ्यांचं भविष्य धूसर आहे (त्यामुळेच, 'उडता पंजाब' घडलाय).**



एम. एस. स्वामीनाथन यांनी आज शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या मार्गात मोदी-शाह सरकारने ठोकलेले खिळे, उभे केलेले अडथळे आणि झालेला लाठीमार व गोळीबार पाहिला असता; तर, 'भारतरत्न' पुरस्कार, थेट भाजपाई-संघीय लोकांच्या थोबाडावर फेकून मारला असता, हे निर्विवाद...कारण, एम. एस. स्वामिनाथन म्हणजे कोणी अमिताभ बच्चन, सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर, कंगना राणावत किंवा अक्षय कुमार नावाची 'भांडवली-व्यवस्थे'ची लाळ घोटणारी कलाकार-बुजगावणी नव्हेत!

उत्तरेतल्या शेतकरी-आंदोलनासंदर्भात वेळोवेळी, ''खुल्या बाजारातली स्पर्धात्मक शेतकी-उत्पन्नाची किंमत घ्या'', हे भाजपाई-संघीय सरकारचं सांगणं म्हणजे... कामगारांचे पगार, त्याच बाजारु-पद्धतीने ठरवण्याचा दुराग्रह धरण्यासारखे आहे (म्हणजे, स्वाभाविकच अगदी तुटपुंजं). सध्याचं तुटपुंजं किमान-वेतन आणि नरेंद्र मोदी सरकारने देऊ केलेली वर्ष-२०१६ मधील फसवी व अपुरी आधारभूत किंमत... या दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू आहेत.

तेव्हा, जे हिंदुत्वाच्या गळाला लागलेले, धार्मिक-उन्मादाच्या भ्रामक जळातले मासे आहेत...त्यांनी समजून घेणं गरजेचं आहे की, या 'भांडवली-व्यवस्थे'चा शत्रू कुठला मुसलमान नव्हे किंवा अन्य कोणी जातधर्मीय नव्हे... तर, समाजाच्या तळागाळातली प्रत्येक व्यक्ति (त्यांनी ट्रक-ड्रायव्हरांना देखील सोडलं नाही), हा भाजपाई-संघीय लोकांचा शत्रू आहे.

यांना कधि तुम्ही कामगार-कर्मचारीवर्गाला सन्मानजनक वेतन व नोकरीत सुरक्षितता देण्यासाठी (म्हणजेच, कंत्राटी-कामगार पद्धती'चं निर्मूलन व 'काळी कामगार-संहिता' अथवा 'ब्लॅक लेबर-कोड'ला विरोध करण्यासाठी वगैरे) करताना, लष्करी तरुणाईची अग्निपथावरील अग्निवीर म्हणून चाललेली कुचेष्टा व कुचंबणा थांबवण्याकामी आवाज उठवताना, शेतकरी-शेतमजुरांच्या आयुष्याला स्थिरता व सुखसमाधान देण्यासाठी (काळे तीन शेतकी-कायदे मागे घेण्यासाठीच्या अथवा MSPसाठीच्या) आंदोलनात वगैरे भाग घेताना पाहिलंय...???

मुद्दा हा आहे की, यांना सर्वसामान्यांच्या जगण्याला मुळातून आधारच द्यायचा नाहीच; उलटपक्षी, असलेले व उरलेसुरलेले कायदेशीर आधार त्यांना नष्ट करायचेत... तळागाळातल्या माणसांनी असुरक्षित 'अस्तित्ववादी' जगणंच जगलं पाहिजे (ज्याला, आपण जगणं म्हणतं नाही; तर, निव्वळ 'तगणं' किंवा कसंबसं तगून रहाणं म्हणतो)... जेणेकरुन, 'गुलाम' म्हणून, ते या भांडवलदारवर्गाच्या अलगद हाती लागतील.

कामगार-कर्मचारीवर्गाला उत्तम वेतन, शेतकऱ्यांना चांगली आधारभूत किंमत देणे...ही दारिद्र्य-निर्मूलनाची मोहीम होय...तोच, म. गांधींनी दरिद्री-नारायणा'ला दारिद्र्यातून बाहेर काढण्याचा दाखवलेला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला 'समतेचा संदेश' व्यवहारात उतरवण्याचा राजमार्ग होय!

**'इंडिया-आघाडी' सत्तेवर आल्यास... 'स्वामिनाथन-आयोगा'च्या शिफारशीनुसार MSP देण्याच्या, राहुल गांधींनी केलेल्या घोषणेचं 'धर्मराज्य पक्ष' हार्दिक स्वागत करतो...मात्र, 'जागतिक तापमानवाढी'तून उद्धवलेल्या निसर्ग-पर्यावरणीय महासंकटांकडे पहाता...रासायनिक खते-कीटकनाशके व संकरित-GM² बियाणे, बेलगाम यांत्रिकीकरण व मोठ्याप्रमाणावर प्लास्टिक आच्छादने व शेतीसाठी लागणाऱ्या प्लास्टिकच्या विविध वस्तू-अवजारांचा अतिरेकी वापर... यासारख्या, आधुनिक शेतीपद्धतीतील विविध निविष्ठांचा मानवी-आरोग्यावर व इतर सजीवसृष्टीवर होणारा अतिशय गंभीर व अंतिघातकी परिणाम विचारात घेता... 'रसायनमुक्त' (संकरित अथवा GM बियाण्यांच्या; तसेच, रासायनिक खते व रासायनिक कीटकनाशकांच्या वापराविना केलेली सेंद्रिय/नैसर्गिक शेती) व शेतातील जीवजिवाणू उध्वस्त करणारं शेतीचं 'यांत्रिकीकरण' शक्यतेवढं टाळणाऱ्या... 'सेंद्रिय/नैसर्गिक शेती'द्वारे झालेल्या, 'रसायनमुक्त आरोग्यदायक' कृषिउत्पादनाला, अशा 'आधारभूत-किंमती'चं अधिकचं (MSPमध्ये नैसर्गिक-शेतमालासाठीच्या खास अधिकच्या 'जोडमूल्या'ची भर घालून, नैसर्गिक शेतमालाला वेगळी जास्तीची 'आधारभूत किंमत' अथवा MSP) संरक्षक-कवच अथवा पाठबळ दिलं जावं, ही निसर्ग-पर्यावरणवादी 'धर्मराज्य पक्षा'ची पुढील रास्त मागणी आहे...धन्यवाद!**

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...The First 'Green-Political Party' Of India)

## (इंग्रजी दिनदर्शिकेनुसार असलेल्या 'शिवजयंति'च्या निमित्ताने....)

शिवछत्रपतींनी एकूणच सर्वधर्मसमभावाचा, न्यायनीतिपूर्ण व्यवहाराचा (''जो चुकला, त्याला ठोकला'', या 'व्यक्ति व जातधर्मपंथ' निरपेक्ष रोकड्या-कणखर नीतिद्वारे)...जो केवळ, महाराष्ट्रापुरताच नव्हे; तर, संपूर्ण विश्वासाठी, मूर्तिमंत आदर्श घालून दिलाय; त्याला, कुठे तोड नाही!

म्हणूनच, ''शिवछत्रपती, म्हणजे केवळ, 'तलवारबाजी' नव्हे; तर, उच्चकोटीच्या जीवनमुल्यांसाठी लावलेली 'प्राणाची बाजी' होती''!

**आपल्या उण्यापुऱ्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात, 'आखरी रास्ता' म्हणून, न्यायनीतिच्या प्रस्थापनेसाठीच, केवळ नाईलाजास्तव तलवार उचलणाऱ्या या महावीराने, आयुष्यात मोजकीच लहानमोठी युद्धं केली...आपल्याला लाभलेल्या अल्पायुष्याचा शक्यतेवढा समय, राज्यकारभाराची न्यायनीतिपूर्ण घडी बसवण्यात त्याने व्यतीत केला व मानवजातीपुढे एक महान आदर्श उभा केला.**

...म्हणूनच, द्वापारयुगात घडलेल्या रामायणातील 'रामा'पेक्षाही, 'शिवाजी' कितीतरी उजवा व श्रेष्ठ होता आणि रामायणकाळ ओलांडून द्वापारयुगाच्या अंताला घडलेल्या महाभारतातल्या 'श्रीकृष्णा'शीच थेट नातं सांगणारा होता! त्याचं कारणही तसंच आहे... शिवछत्रपतींनी श्रीकृष्णालाच आपल्या सकल व्यवहारात उतरवलं (रामाला नव्हे) ते इतकं पराकोटीचं की, शिवछत्रपतींचा 'गनिमीकावा' असो, कठीण समय पाहून युद्धभूमीवरुन तात्पुरती माघार घेत योग्यसमय व योग्य युद्धभूमी निवडून शत्रूवर प्रतिहल्ला करणं असो (जसा, श्रीकृष्ण जरासंधाच्या मथुरेवरील सतरा आक्रमणांपासून माघार घेता झाला व ज्यामुळे, त्याला 'रणछोडदास' म्हणून संबोधलं गेलं...पण, अंति श्रीकृष्णानेच भीमाकरवी कौशल्याने जरासंधाचा वध केला, तद्वतच), त्यांची अखंड सावधानता असो, संकटातून न डगमगता मार्ग काढण्याची हातोटी असो, प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात टाकून आघाडीवर राहून लढणं असो वा असो न्यायनीतिपूर्ण व्यवहार करण्याप्रसंगीची कठोरता... ही अशी अनेक स्वभाववैशिष्ट्ये, रणनीति व राज्यव्यवहार श्रीकृष्णाच्याच जीवनचरित्रावर-जीवनसंदेशावर पूर्णतः बेतलेला होता.

**श्रीकृष्ण काय किंवा शिवछत्रपती काय; या दोघांनीही जनकल्याणार्थ जी प्रासंगिक 'धोरण-लवचिकता' दाखवली, ती लोकविलक्षणच होती... जी 'धोरण-लवचिकता', रामाला आपल्या संपूर्ण आयुष्यात व्यवहारात उतरवून अधिकचं जनकल्याण साधणं शक्य होतं...सीता व लवकुश या आपल्या कुटुंब-सदस्यांवर पराकोटीचा अन्याय होऊ न देणंही शक्य होतं... पण, शक्य असतानाही ते रामाला जमलं नव्हतं; कारण, महाभारतातल्या पितामह भीष्मांसारखीच आपल्या निहीत तत्त्वांना-वचनांना अविवेकी व अवाजवी कवटाळून बसण्याची रामाची घातकी वृत्ती नडली!**

म्हणूनच, राम 'सत्ययुगा'त किंवा अधिक ताणलं तर, फारतर त्रेतायुगात 'आदर्श' म्हणून मिरवता येऊ शकेल... पण, श्रीकृष्ण काय किंवा शिवछत्रपती काय, ही दोन्ही महान व्यक्तित्वं...काळारंभीच्या 'सत्ययुगा'पासून आजच्या 'कलियुगा'पर्यंतच्या चारही-युगांच्या महाचक्रात कायमच 'आदर्श व अनुकरणीय' म्हणून, ध्रुवतार्‍यासारखी अढळ राहू शकतात!

तेव्हा, आज भारतातच नव्हे; तर, जगाच्या पाठीवर कुठेही...न्यायनीति, सुखसमाधान, शांतिच्या प्रस्थापनेसाठी, आपल्याला निरतिशय गरज आहे...ती रामाची नव्हे; तर, अवघ्या समष्टीच्या जगण्यातलं न्यायनीति-विवेकपूर्ण संतुलन-समन्वय साधणाऱ्या श्रीकृष्णाची आणि शिवछत्रपतींची...!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# नवश्रीमंत तरुणाईच्या, चंगळवादी जीवनशैलीचा उन्माद!

...मुळातूनच 'भांडवली-व्यवस्था', हे मनुष्यजातीला जडलेलं, स्वतःच एक भयंकर 'व्यसन' असल्याने... तदनुसारच, आजची 'कौटुंबिक-व्यवस्था'देखील आत्मकेंद्रित व चंगळवादी बनत चाललीय, यात नवल ते काय?

एकूणच भांडवली-व्यवस्थेतील अमानुष स्पर्धेला आपल्या अंगी भिनवूनच, त्याला समांतर अशी आपली आजची कौटुंबिक-व्यवस्था पुढे धावू पहाते. शिक्षण घेत असतानाचे भयानक ताणतणाव आणि आपल्यापेक्षा वयाने थोडे मोठे असलेल्या, शिकूनसवरुन नोकरीला लागलेल्यांचे... कॉर्पोरेटीय नोकरीतील गलिच्छ राजकारणामुळे व कंपनी-दहशतवाद अथवा Corporate-Terrorism पोटी होणारे भयंकर हाल, ती पहात असते. तसेच, कंपन्यांमधील 'कंत्राटी-कामगार/कर्मचारी पद्धती'तील घृणास्पद शोषण, निर्ममता, संवेदनशून्यता; यामुळे झालेलं, पुढच्या पिढीचं आत्यंतिक 'असुरक्षित' जीवन, ही आजची शिकणारी नवतरुणपिढी पहात असते. ती पहाते, ते वयाने आठदहा वर्षे मोठे असणाऱ्या तरुणपिढीचे, परतीचे कापले गेलेले दोर, अचानक त्यांना गमवाव्या लागणाऱ्या नोकऱ्या...त्यांचा दिशाहीन असा पुढचा प्रवास, ज्याला अंतिम 'गंतव्य-स्थान' कुठलं, हे त्यापैकी कुणालाच काहीकेल्या उमगलेलं नसतं आणि हे सगळं पहात पहात शिकणाऱ्या, या तरुणाईच्या डोळ्यासमोर अंधार दाटत जातो. आजुबाजुचा नवश्रीमंतांचा चंगळवाद-जीवनशैलीचा उन्माद, नको त्या नवथर वयात, सतत खुणावत रहातो आणि त्याचा मोह टाळणं, त्यांना स्वाभाविकच खूप अवघड जातं, जाणारच. त्याचाच परिपाक म्हणून, त्यांच्या हातून वेडीवाकडी पावलं टाकली जातात. आपली साठी-सत्तरीतील पिढी, त्यादृष्टीने पहाता सुदैवी म्हणावी लागेल आणि श्रीमंत व संसाधनसंपन्न असूनही, ही आजची तरुणपिढी दुर्दैवी म्हणावी लागेल. आपण नैसर्गिक



वातावरणात अल्पसंतुष्टता बाळगून जगलो, म्हणूनच सुसंस्कृत राहू शकलो. हे आजचं, घरोघरी व्यक्तिगत-अहंकाराचा विस्फोट झालेलं चंगळवादी-वातावरण, आपल्या प्राक्तनात असतं; तर, फार काही वेगळं न होता, आपणही बऱ्यापैकी तसेच घडलो असतो! आपल्याला अगदी एकत्रकुटुंब पद्धतीचा प्रसंगी नसला; तरीही, कौटुंबिक अकृत्रिम प्रेमाचा लाभ झाला व आजच्यासारख्या क्रौर्यपूर्ण-कठोरतेनं भरलेल्या अतिरेकी स्पर्धात्मक वातावरणाचा संसर्ग, बव्हंशी झाला नाही, हे विसरुन चालणार नाही.

धीरुभाई अंबानींना, तुमचा रिलायन्स-साम्राज्य विस्ताराचा प्रवास, नेमका कुठे थांबणार आहे?, असा एका चौकस पत्रकाराने प्रश्न विचारताच, अभावितपणे धीरुभाई बोलून गेले की, मला फक्त पुढे जात रहाणं, एवढंच माहीतेय! ...ज्यांना, पुढे नेमकं कुठे व कुठवर जायचं, हेच 'गंतव्य-स्थान' माहित नसतं...तेच आपले आजचे आदर्श किंवा भाग्यविधाते असतात; जगण्याच्या मूलभूत गरजाच केवळ, भागवणारं संजीवक-जीवन जगा (Need-Based Life...मर्यादित गरजांचं जगणं), असं म्हणणारे म. गांधी वगैरे कुणी नव्हेत...ही, रोज अनावश्यक नवनव्या गरजांचा (अतिशय मादक व आकर्षक जाहिरातबाजीतून 'भांडवली-व्यवस्थे'ने वाढवत नेलेल्या) गुणाकार चक्रवाढ श्रेणीनं करणारी, दुर्दैवी व भयावह सद्यस्थिति आहे आणि त्यातूनच, उद्भवलेली 'उडता पंजाब'सारखी, 'उडता महाराष्ट्र', ही परिस्थिती आहे!

...जेव्हा आपलं 'भारतीय-अध्यात्म' (आजच्या राजकारणातलं बनावट-बेगडी 'हिंदुत्व' नव्हे), आपल्याला 'मोक्ष' प्राप्तीसाठी आतून 'विकास' (आत्मिक-विकास) साधायला शिकवत असतं किंवा तेच आपल्या आयुष्याचं 'इप्सित' असतं...तेव्हा, तरुण मनामनांचं व पर्यावरणाचं भयंकर प्रदूषण करणाऱ्या व 'भौतिक-विकास' साधण्याचा अट्टाहास करणाऱ्या, नफेखोर भांडवलदारवर्गाला मागे वळणं किंवा थबकणं-थांबणं...हे 'कपाळमोक्ष' करुन घेण्यासारखंच वाटत रहातं (भांडवली-व्यवस्थेचं तेच, अजब आत्मघातकी व समाजघातकी समीकरण आहे)...अशारितीने, ही 'भांडवली-व्यवस्था' एका अंधःकारमय दरीत पुढे चाल करत उडी मारायला निघालीय...तेच तिचं अटळ प्राक्तन असताना, तरुणाईला या कोवळ्या वयात ते उमगू शकणं अशक्यप्रायच असतं! आणि म्हणूनच, ही नवतरुणपिढी, अर्थकारणावर मगरमिठी घालून बसलेल्यांनी...निर्माण केलेल्या विधिनिषेधशून्य-नीतिशून्य बाजारपेठीय 'भांडवली-सापळ्या'त, नकळत अचूक अडकून पडते (आठवा, गौतम अदानीच्या खाजगी मालकीच्या गुजरामधील मुंद्रा-बंदरात अनेकदा सापडलेले हजारो कोटींचे अंमली-पदार्थ)... तेव्हा, साप समजून भुई कितीकाळ आपण थोपटत रहाणार, हा मूलभूत प्रश्न आहे. व्यवस्थेनं निर्माण केलेले प्रश्न, 'व्यवस्था-बदल' घडवूनच सुटू शकतात (No use, treating the symptoms...let's treat the roots of the disease!)...अन्य सगळेच मार्ग, काळाच्या पटलावर तकलादू ठरत जातात... धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ''शिवछत्रपती, म्हणजे 'तलवारबाजी' नव्हे; तर 'महान जीवनमूल्यांसाठी लावलेली 'प्राणांची बाजी'!''

**शिवछत्रपतींनी शेतीला सर्वंकष उत्तेजन दिलं... शेतीला उत्तेजन देतानाच, भूमिहीन भूदासांना (Serfs) कसायला जमिनीचे पट्टे नावावर करुन दिले. नैसर्गिक-आपत्तीत बी-बियाणे, शेतीची अवजारे पुरवून प्रसंगी शेतसारा देखील माफ केला...भूमिहीन कुळांच्या आयुष्याला 'स्थिरता' दिली. म्हणजेच, आजच्या परिभाषेत सांगायचं; तर, 'कंत्राटी-कामगार', नावाच्या आधुनिक 'गुलामां'ना (ज्यांच्या जगण्यातली 'सुरक्षितता, स्थिरता व सन्मान' हिरावून घेतला गेलाय) नोकरीत 'कायम' केले!**

आपले राजकीय अंतःस्थ हेतू साध्य करण्याकामी, शिवछत्रपतींचं उठताबसता शिवछत्रपतींचं नाव घेणारे आजचे राज्यकर्ते व एकूणच सगळे प्रस्थापित राजकारणी, बरोबर उलटा व्यवहार-कारभार करताना दिसतात. 'कंत्राटी-कामगार पद्धत-आऊटसोर्सिंग' वगैरे कामगारघातकी व घटनाविरोधी ('Directive principles of state policy' अथवा घटनेतील 'राज्यकारभाराच्या मार्गदर्शक सूत्रां'च्या पूर्णतया विपरीत) पायंडे पाडून व चार काळ्या कामगार-कायद्यांची नवी काळीकुट्ट 'कामगार-संहिता' लादून... बहुसंख्य असलेल्या सगळ्याच कामगार-कर्मचारीवर्गाच्या आयुष्यात, प्रचंड 'अस्थिरता व अस्वस्थता' त्यांनी निर्माण केलीय. त्याद्वारे, अवघ्या कामगारविश्वालाच निव्वळ 'अस्तित्ववादी-गुलाम' बनवलंय... नाव शिवछत्रपतींचं; पण, कारभार औरंगजेबाचा!

**...तेव्हा, शिवछत्रपतींचं हे वैशिष्ट्य, सतत ध्यानात ठेवलं पाहिजे की, त्यांनी शेतीला उत्तेजन देताना, एकाचवेळेस गोरगरीब भूमिहीनांच्या हाती हक्काचा 'नांगर' दिला (ज्यातून, राज्याची पडीक जमीन लागवडीखाली येऊन राज्याचा महसूलही वाढला) आणि गोरगरीब रयतेला लुटणाऱ्या तत्कालिन अत्याचारी बड्या धेंडांच्या गडकोटांवर गाढवाचा 'नांगर' फिरवला. त्यातूनच, गोरगरीब जनतेला प्रथमच कुठे न्याय मिळाला, जगण्याला भक्कम आधार मिळाला. त्यांना ''शिवाजी, हा रयतेचा राजा आहे आणि 'शिवाजी'चं राज्य, हे रयतेचं राज्य आहे'', असं प्रथमच खात्रीपूर्वक वाटू लागलं!**

**...आणि, म्हणूनच, शिवछत्रपतींच्या हाती तलवारीऐवजी, 'नांगर' दिसला पाहिजे, 'नांगर' दाखवायला पाहिजे!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)




# कॅरम हा मराठी माणसाच्या रक्तात उतरलेला खेळ! -राजन राजे

**मुंबई :** ''कॅरम हा एकमेव असा खेळ आहे, ज्यामध्ये दुहेरी स्पर्धेइतकीच, एकेरी स्पर्धेतही रोचकता असते. कोरोनाच्या काळात तर, या खेळाने अनेकांना नैराश्यापासून वाचवलं. कुठल्याही मोसमात खेळता येणाऱ्या या खेळात मोठी रंजकता तर आहेच, शिवाय खेळताना बुद्धि, कला-कौशल्य-कसब, त्याचबरोबर धैर्य आणि संयम यांचा कसही लागतो'' असे गौरवोद्गार 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी दादर येथे काढले. निमित्त होतं, 'महाराष्ट्र कॅरम असोसिएशन' आयोजित ''महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफी, २०२३-२०२४'' या कॅरमविश्वातील भव्यदिव्य अशा स्पर्धेचं... मंगळवार, दि. १३ फेब्रुवारी-२०२४ रोजी, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड सभागृह, दादर, मुंबई येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, शंभर टक्के नैसर्गिक आणि पर्यावरणवादी असलेल्या या क्रिडाप्रकारातील स्पर्धेला मा. राजन राजे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यावेळी उपस्थित खेळाडूंना शुभेच्छा देताना ते पुढे म्हणाले, ''कॅरम असोसिएशनचे महासचिव श्री. अरुण केदार यांचं या खेळातील योगदान खूप मोठे आहे. स्पर्धेसाठी वापरण्यात आलेलं दर्जेदार साहित्य, स्पर्धेतील सातत्य, भव्य बक्षिसं याबद्दल कौतुक आहेच; मात्र, भविष्यात कॅरमला सोन्याचे दिवस यावेत. कारण कॅरम हा, मराठी माणसाच्या रक्तात उतरलेला खेळ आहे, त्याला प्राधान्य मिळायलाच हवे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!'' अशा शब्दात मा. राजन राजे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष श्री. जितेंद्र शाह, संचालक श्री. भरत देसाडीया आणि महासचिव श्री. अरुण केदार यांच्यासह, असोसिएशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित

## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!

राजन राजे
(अध्यक्ष)





महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७



कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)